मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १३२ ■ सोमवार, १९ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## वडघर जिल्हा परिषद व करंजाडे पंचायत समिती साठी शिवसेनेने कसली कंबर

**दैनिक युवक आधार**


**पनवेल (वार्ताहर) :** उरण विधानसभा मतदारसंघातील वडघर जिल्हा परिषद व पंचायत समिती साठी शिवसेनेने कसली कंबर असून त्या दोन्ही जागेवर शिवसेनेकडून उमेदवार लढण्यास इच्छूक आहे.राज्य निवडणूक आयोगाने रायगड जिल्हा परिषद पनवेल आणि उरण पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला असून गुरुवार ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. पनवेल तालुक्यात ८ जिल्हा परिषद गट व १६ पंचायत समिती गण तर उरण तालुक्यात ४ जिल्हा परिषद गट व ८ पंचायत समिती गण आहेत. यामध्ये आरक्षण सोडतीत उरण विधानसभा मतदारसंघातील वडघर जिल्हा परिषदसाठी सर्वसाधारण स्त्री साठी तर करंजाडे पंचायत समिती नागरिकांचा मागास प्रवर्ग साठी राखीव झाला आहे. या दोन्ही जागांसाठी शिवसेनेकडून इच्छूकांशी बोलणी सुरु आहे. राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात आपल्या कामाचा दबदबा राखणारे त्याचप्रमाणे सकल मराठा समाजाच्या विविध आंदोलनांत सक्रिय सहभाग घेऊन नेतृत्व करणारे शिवसेना जिल्हा प्रमुख विनोद साबळे यांच्या पत्नी व करंजाडे ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच राजश्री विनोद साबळे तसेच शिवसेनेचे करंजाडे शहर प्रमुख मिरेंद्र शाहारे यांच्या पत्नी व करंजाडे ग्रामपंचायत सदस्य प्रिती मिरेंद्र शहारे या दोघींनी वडघर जिल्हा परिषदसाठी शिवसेनेकडून लढवण्यासाठी इच्छूक असल्याची गोष्ट वरिष्ठांच्या कानावर घातली आहे. तर करंजाडे पंचायत समिति साठी शिवसेनेचे वडघर विभागप्रमुख रवि पाटील व उपतालुकाप्रमुख गौरव गायकवाड इच्छुक आहेत. यासंबंधी पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कर्तव्यपथावर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा जयघोष

## प्रजासत्ताक दिनी अवतरणार आत्मनिर्भर 'गणेशोत्सवा'चा भव्य चित्ररथ

**नवी दिल्ली :** ७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी राजधानी नवी दिल्ली सज्ज झाली आहे. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यंदा हा सोहळा ऐतिहासिक ठरणार आहे. या भव्य संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ 'गणेशोत्सव : आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेतून राज्याची परंपरा आणि आर्थिक शक्तीचे दर्शन अवघ्या जगाला घडवणार आहे.

संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी या सोहळ्याच्या तयारीची अधिकृत माहिती दिली. यंदाच्या सोहळ्याला युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत कर्तव्यपथावर भारताच्या लष्करी सामर्थ्यासोबतच सांस्कृतिक समृद्धीचे प्रदर्शन होईल.



यंदाच्या संचलनात सहभागी होणाऱ्या एकूण ३० चित्ररथांमध्ये महाराष्ट्राचा चित्ररथ आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून जी सामाजिक क्रांतीची बीजे पेरली, तीच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचे प्रभावी चित्रण यात पाहायला मिळेल. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथातून मांडली जाणार आहे. तसेच, महाराष्ट्राची अस्मिता असलेली ढोल-ताशा पथके आणि सामाजिक एकात्मता यातून 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेश दिला जाईल.

लष्करी ताकदीच्या प्रदर्शनात यंदा प्रथमच 'बॅटल ॲरे' (Battle Array) ही युद्ध रचना प्रदर्शित केली जाणार आहे. यामध्ये अर्जुन टँक, टी-९० भीष्म, राफेल विमाने आणि स्वदेशी बनावटीच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे चित्तथरारक दर्शन घडवले जाईल. संचलनात १८ लष्करी तुकड्या आणि १३ बँड्ससह एकूण ३० चित्ररथ सहभागी होतील. २,५०० कलाकारांच्या सांस्कृतिक सादरीकरणाला ऑस्कर विजेते संगीतकार एम.एम. कीरावानी यांचे संगीत आणि ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांचा भारदस्त आवाज लाभणार आहे.

यंदाचा सोहळा 'जनभागीदारी'वर आधारित असून, १०,००० विशेष पाहुण्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. यात इस्रोचे शास्त्रज्ञ, लखपती दीदी आणि प्रगत शेतकऱ्यांचा समावेश आहे.

नागरिकांच्या सुविधेसाठी 'राष्ट्रपर्व' हे विशेष पोर्टल आणि ॲप विकसित करण्यात आले असून, तिकीटधारकांसाठी दिल्ली मेट्रोचा प्रवास मोफत ठेवण्यात आला आहे. संचलनानंतर २६ ते ३१ जानेवारी दरम्यान लाल किल्ल्यावर 'भारत पर्व'चे आयोजन करण्यात आले असून, तिथेही महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आस्वाद घेण्याची संधी देशवासियांना मिळणार आहे.

## ज्येष्ठ नागरिकाचा अपघाती मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** खारघर मधील उत्सव सर्कल जवळ भरधाव सिमेंट काँक्रिट बल्करने मोटारसायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील व्यक्ती सिमेंट बल्करच्या चाकाखाली आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. खारघर पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेल्या सिमेंट बल्कर चालकाविरोधात गुन्हा दाखल करुन त्याला ताब्यात घेतले आहे.या अपघातात मृत झालेल्या व्यक्तीचे नाव अशोक मादापाटील (६६) असे असून ते खारघर, सेक्टर-१२ मधील सनसफल सोसायटीत कुटुंबासह राहत होते. अशोक मादापाटील कामानिमत्त आपल्या मोटारसायकलवरुन सेंट्रल पार्क कडून खारघर हायवेकडे जात होते. यावेळी उत्सव चौकातील वळणावर सिमेंट बल्कर वाहनाने त्यांच्या मोटारसायकलला धडक दिली. त्यामुळे ते मोटारसायकलसह सिमेंट बल्करखाली आले. या अपघातात अशोक मादापाटील गंभीर जखमी झाल्याने त्यांचा काही वेळातच मृत्यू झाला. या अपघातानंतर खारघर पोलिसांनी सिमेंट बल्कर वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करुन त्याला ताब्यात आहे.

## वैद्यकीय महाविद्यालयाच्या कारभाराविरोधात आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**सिंधुदुर्ग, प्रतिनिधी :**

सिंधुदुर्ग मेडिकल कॉलेजमध्ये रुग्णांची हेळसांड झाल्याने माजी आमदार वैभव नाईक यांनी मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. अनंत दवंगे यांना जाब विचारत रुग्णालयाच्या कामकाजात सुधारणा झाली नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

सिंधुदुर्ग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाने पोटात ट्यूमर असलेल्या एका महिला रुग्णाला हायरिस्क गर्भवती असल्याचा चुकीचा अहवाल देऊन तिला गोवा-बांबोळी रुग्णालयात हलविले.

तसेच कर्करोग असलेल्या एका रुग्णाला तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याचे कारण देत



छत्रपती संभाजीनगरला पाठविण्यात आले. त्यामुळे रुग्णांची हेळसांड झाली.


यावरून शिवसेनेचे माजी आमदार वैभव नाईक यांनी संतप्त होत सिंधुदुर्ग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. अनंत दवंगे यांची शनिवारी भेट घेऊन झाल्या प्रकाराबाबत जाब विचारला.

यावेळी कसाल जि. प. ठाकरे सेना विभागप्रमुख रवीबुवा कदम उपस्थित होते.

## आनंदवार्ता!; आता नाशिक, जळगावहून थेट दार्जिलिंग आणि महाबोधी मंदिराचा प्रवास सोपा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक, प्रतिनिधी :** पूर्व भारताशी (उत्तर बंगाल) नाशिक, उत्तर महाराष्ट्राला जोडणारी नवीन अलिपूरद्वार-मुंबई (पनवेल) अमृत भारत एक्स्प्रेस सुरू झाली आहे. पूर्व भारत आणि पश्चिम किनारपट्टी यांच्यात ती महत्वाचा दुवा ठरेल. हा मार्ग अनेक प्रसिद्ध पर्यटनस्थळांना जोडणारा असून त्याचा महाराष्ट्रातील नाशिक, जळगावसह ठाणे आणि रायगड जिल्ह्यांला फायदा होणार आहे.भारत-भूतान आंतरराष्ट्रीय सीमेजवळ असलेल्या अलिपूरद्वार येथून सुरू होणारी ही सेवा अनेक कारणांनी महत्वाची ठरेल.



एका संवेदनशील सीमावर्ती भागातील वाहतूक सुलभ करून आणि अनेक राज्यांमध्ये पूर्व-पश्चिम राष्ट्रीय कनेक्टिव्हिटी मजबूत करणार असल्याचे रेल्वे मंत्रालयाने म्हटले आहे. ही अमृत भारत एक्स्प्रेस साप्ताहिक सेवा म्हणून धावेल. अलिपूरद्वार-मुंबई (पनवेल) अमृत भारत एक्स्प्रेस अलिपूरद्वार येथून गुरुवारी सकाळी ४:४५ वाजता सुटेल आणि पनवेल येथे शनिवारी सायंकाळी ५:३० वाजता पोहोचेल. पनवेल-अलिपूरद्वार अमृत भारत एक्सप्रेस पनवेल येथून सोमवारी सकाळी ११:५० वाजता सुटेल आणि बुधवारी दुपारी १:५० वाजता अलिपूरद्वार येथे पोहोचेल. महाराष्ट्रात ती कल्याण, नाशिकरोड, जळगाव व भुसावळ या ठिकाणी थांबणार आहे.हा मार्ग अनेक प्रसिद्ध पर्यटन स्थळांनाही जोडतो. यामध्ये चहाच्या मळ्यांसाठी आणि हिमालयीन दृश्यांसाठी प्रसिद्ध असलेले दार्जिलिंग, एक महत्त्वाचे प्राचीन बौद्ध शिक्षण केंद्र असलेले विक्रमशिला महाविहार, बिहार सर्किटवर जवळच असलेले महाबोधी मंदिर, भारतातील सर्वात पवित्र तीर्थक्षेत्रांपैकी एक असलेला त्रिवेणी संगम, रामायणाशी जवळून संबंधित असलेले चित्रकूट धाम आणि भगवान शंकराच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले त्र्यंबकेश्वर मंदिर यांचा समावेश आहे.धार्मिक, सांस्कृतिक आणि वारसा स्थळांपर्यंतची जाण्याचा मार्ग प्रशस्त झाल्यामुळे पर्यटनाला चालना मिळेल, स्थानिक हस्तकला आणि आदरातिथ्य सेवांना प्रोत्साहन मिळेल आणि मार्गावरील लहान व्यवसायांना पाठिंबा मिळेल अशी अपेक्षा आहे.


## कुटुंब नाही म्हणून महिलेला संरक्षणगृहात डांबणे अयोग्य; मानवी तस्करीतून सुटका केलेल्या प्रौढ महिलेला दिलासा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** मानवी तस्करीविरोधी कारवाईदरम्यान सुटका केलेल्या प्रौढ महिलेला केवळ कौटुंबिक आधार नाही या कारणास्तव तिच्या इच्छेविरुद्ध संरक्षणगृहात डांबून ठेवता येणार नाही. अशा प्रकारची कोठडी तिच्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या आणि मुक्त संचाराच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने महिलेला दिलासा देताना दिला.

न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांच्या एकलपीठाने महिलेची सुटकेची मागणी मंजूर करताना उपरोक्त निर्वाळा दिला. या महिलेची येवला पोलिसांनी हॉटेल विजय लॉजिंगवर टाकलेल्या छाप्यादरम्यान सुटका केली होती आणि नंतर कनिष्ठ न्यायालयांनी अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायद्यांतर्गत (पीटा) दिलेल्या आदेशानुसार तिला ताब्यात ठेवण्यात आले होते.

पोलिसांनी छाप्यादरम्यान दोनजणांना



अटक केली होती आणि याचिकाकर्तीसह चार महिलांची सुटका केली होती. याचिकाकर्तीवर कोणताही गुन्हा दाखल नसला तरी, दंडाधिकाऱ्यांनी १९ एप्रिल २०२५ रोजी तिला येवला येथील महिलांच्या वसतिगृहात एक वर्षासाठी ठेवण्याचे आदेश दिले होते. तिची काळजी घेण्यासाठी कोणीही नातेवाईक नाहीत आणि तिच्याकडे उत्पन्नाचे कोणते साधनही नाही, असे निरीक्षण दंडाधिकाऱ्यांनी नोंदवले होते. तिची वैयक्तिक जामिनावर सुटका केल्यास ती पुन्हा अनैतिक कृत्यांमध्ये सामील होण्याची दाट शक्यता आहे, अशी भीतीही दंडाधिकाऱ्यांनी तिला वसतिगृहात ठेवण्याचे आदेश देताना व्यक्त केली होती.या निर्णयाविरोधातील याचिकाकर्तीच्या अपिलाला सरकारी पक्षाने उच्च न्यायालयात विरोध केला, याचिकाकर्तीच्या सुरक्षेची हमी देण्यासाठी कोणीही नातेवाईक नाहीत आणि तिच्या पालकांच्या घटस्फोटानंतर ती एकटीच राहत होती, यावर जोर दिला. कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर, इतर दोन पीडितांची त्यांच्या पालकांनी जबाबदारी घेतल्याने दंडाधिकाऱ्यांनी त्यांना सोडण्याचे आदेश दिले होते. याउलट, याचिकाकर्तीची स्थिती होती. तिची जबाबदारी घेण्यासाठी कोणीही नव्हते, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

त्याचप्रमाणे, पीटा कायदा हा लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या महिलांना शिक्षा देण्यासाठी नाही. तसेच, याचिकाकर्ती पुन्हा अनैतिक कृत्यांमध्ये सामील होऊ शकते या निराधार दाव्याच्या आधारे तिच्यावर अवाजवी निर्बंध लादले जाऊ शकत नाहीत. किंबहुना, याचिकाकर्ती ही एकटी होती ही वस्तुस्थिती तिला संरक्षण गृहात डांबून ठेवण्यासाठी पुरेसे न्याय्य कारण असू शकत नाही, असेही न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयंचे आदेश रद्द करताना प्रामुख्याने स्पष्ट केले. त्याचवेळी, याचिकाकर्तीच्या तात्काळ सुटकेचे आदेश दिले. अनावश्यक अटकेद्वारे सज्ञान पीडित महिलांच्या मुक्त संचाराच्या मूलभूत हक्कावर गदा आणली जाऊ शकत नाही हेही न्यायालयाने नमूद केले.

**आपण पीडित आहोत, गुन्हेगार नाही**

येवला येथील सत्र न्यायालयाने २४ जून २०२५ रोजी हा आदेश कायम ठेवला, सुटका केलेल्या पीडित महिलांचे व्यावसायिक कारणासाठी शोषण करण्यात आले होते आणि त्यांची जीवनस्थिती पाहता त्यांना वसतिगृहात ठेवणे योग्य आहे, असे सत्र न्यायालयाने आदेशात नमूद केले होते. दंडाधिकारी आणि सत्र न्यायालयाच्या निर्णयांना याचिकाकर्तीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. तसेच, ती शोषणाची बळी आहे, गुन्हेगार नाही.

## फळे, भाजीपाला निर्यातीकरिता बापगांव येथे मल्टी मॉडेल हब उभारणार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** भाजीपाला निर्यातीकरिता शेतकऱ्यांसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगांव (ता. भिंवडी) येथे सर्वोपयोगी – मल्टी मॉडेल हब व टर्मिनल मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य कृषि पणन महामंडळाला ७ हेक्टर ९६.८० आर जमीन उपलब्ध करून देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या जागेवर जागतिक बँक व महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) या प्रकल्पाच्या माध्यमातून हब, टर्मिनल उभारण्यात येणार आहे. ज्यासाठी ९८ कोटी ६६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला गेला आहे. ही जमीन राज्य कृषी पणन महामंडळाला वर्ग – २ धारणाधिकारांने विनामूल्य दिली जाणार असून, या ठिकाणी व्हेपर हिट ट्रीटमेंट, प्लॅंट विकीरण, पॅक हाऊस सुविधा तसेच फळे- भाजीपाला साठवणुकीकरिता सुविधांची उभारणी केली जाणार आहे. याठिकाणी आंबा, मसाले, पशुखाद्य यांच्यावर विकीरण प्रक्रियेद्वारी निर्जलीकरण करण्यात येणार आहे.

या प्रकल्पामुळे दरवर्षी एक लाख टन शेतमालाची हाताळणी करणे शक्य होणार आहे. ठाणे जिल्ह्यासह, राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी एक मोठी सुविधा निर्माण होणार आहे. यातून शेतमाल निर्यातीस प्रोत्साहन मिळणार आहे. शेतमालाची गुणवत्ता सुधारणे, प्रक्रिया करणेची सुलभ होणार आहे. याठिकाणी व्यापारी व निर्यातदार यांना एकाच छताखाली आणले जाणार आहे. यातून निर्यात आणि लॉजिस्टिक (logistics) सेवांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. निर्यातवाढीमुळे परकीय चलन मिळणार आहे. जगभरातील बाजारपेठा व प्रकल्पांचा अभ्यास करुन एकात्मिक असा प्रकल्प उभारणेत येणार असल्यामुळे शेतमालाचे काढणीपश्चात नुकसान कमी होण्यास व मालाचा दर्जा सुधारण्यास मदत होणार आहे.

# नरेंद्राचार्यजी महाराजांच्या प्रेरणेने पालोदमध्ये दातृत्वाचा 'महासंगम'

## १०५१ बाटल्या रक्त संकलित करून रचला इतिहास!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या संकल्पनेतून आणि प्रेरणेने आयोजित 'जीवनदान महाकुंभ २०२६' अंतर्गत पालोद (ता. सिल्लोड) येथे माणुसकीचे एक अभूतपूर्व दर्शन घडले. 'माणूस माणसाच्या कामी येतो' हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून पालोदकरांनी शुक्रवारी एकाच दिवसात तब्बल १०५१ रक्तकुपिका (बॅग्स) संकलित केल्या. विशेष म्हणजे, सलग दुसऱ्या वर्षी पालोदच्या ग्रामस्थांनी विक्रमी रक्तदान करून स्वतःचाच जुना विक्रम मोडीत काढला असून संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले आहे.



स्थानिक संत गजानन महाराज मंदिर परिसरात पार पडलेल्या या भव्य शिबिराचा प्रारंभ जगद्गुरूंच्या प्रतिमेच्या पूजनाने झाला. गेल्या आठवड्याभरापासून गावात रॅली, शालेय विद्यार्थ्यांचे प्रबोधन आणि बैठकांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली होती. याचाच परिणाम म्हणून केवळ पुरुषच नव्हे, तर महिला आणि युवतींनीही मोठ्या संख्येने रांगेत उभे राहून रक्तदान केले. 'तुम्ही जगा, दुसऱ्याला जगवा' हा संदेश प्रत्यक्षात उतरवणाऱ्या या उपक्रमामुळे तरुणाईमध्ये मोठा उत्साह दिसून आला.

**दिव्यांग बांधवांचे योगदान ठरले दिशादर्शक**

या शिबिराचे सर्वात मोठे आकर्षण चिंचपूरचे देविदास गंगाराम म्हस्के आणि पालोदवाडीचे प्रकाश सूर्यभान सपकाळ हे दोन दिव्यांग बांधव ठरले. स्वतः शारीरिक अडचणीत असतानाही केवळ समाजऋण फेडण्याच्या उदात्त भावनेतून त्यांनी केलेले रक्तदान पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. त्यांच्या या कृतीने उपस्थितांना नवी प्रेरणा दिली.

रामानंद संप्रदाय जिल्हा व तालुका सेवा समितीच्या वतीने या भव्य उपक्रमाचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले होते. 'संग्राम सेना'च्या जवानांनी पार्किंग आणि शिस्तीची धुरा सांभाळली, तर पालोद सेवा केंद्राच्या वतीने दात्यांसाठी चहा, अल्पोपहार आणि महाप्रसादाची चोख व्यवस्था केली होती.

'आदर्श' ब्लड बँकेच्या डॉक्टरांच्या पथकाने रक्त संकलनाची तांत्रिक बाजू सांभाळली.

संप्रदायाचे पदाधिकारी, आजी-माजी कार्यकर्ते आणि भक्तांच्या विशेष परिश्रमामुळे हा महाकुंभ यशस्वी झाला असून, या ऐतिहासिक यशाबद्दल पालोदकरांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जिजामाता इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये जिजाऊ जयंती निमित्त स्नेहसंमेलन उत्साहात साजरे



**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव ( यवतमाळ) :** जिजामाता इंग्लिश स्कूलमध्ये जिजाऊ जयंती निमित्त स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले. विद्यार्थ्यांनी गीत-नृत्य-नाटक सादर करून जिजाऊंच्या धैर्य, मातृत्व आणि समाजसेवेचा संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचवला. प्राचार्यांनी एकतेचे आणि मदतीचे महत्त्व पटवले; कार्यक्रमासाठी पालक-शिक्षकांचा सक्रिय सहभाग दिसून आला.आजचे कार्यक्रमाचे अध्यक्ष महागाव नगर पंचायत च्या अध्यक्षा सौ सुनंदाताई दिलीप कोपरकर , प्रमूख पाहुणे सौ निर्मला सयाम, साधना वंजारे, प्रा. भावनाताई तायडे, संस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनीता विभुते, होत्या यावेळी जिजामातेच्या भूमिकेत कृतिका वाघमारे, प्रांजल जामकर, श्रिजा नरवाडे ह्या चिमुकल्या होत्या तर आले मराठे गीतावर मृण्मयी सुरोशे, परी कराळे, मीनल पवार यांनी सुंदर नृत्य सादर केले. आय लव माय इंडिया या गीतावर चैतन्य भवरे ,उन्नती तडसे, स्वरवी कांबळे अधिरा गायकवाड तसेच नाटिका रीयांश सुरोशे, आलोक कराळे यांनी केले. या कार्यक्रमाचे नियोजन शाळेतील संचालिका सौ. सुनीता विभुते मॅडम, शिक्षिका रमा दिवेकर, स्वाती कावळे, लोंढे ताई यांनी केले.

# उमरखेड विधानसभा : विकासाच्या नावाखाली लूट, भाजपचा ग्रामीण जनतेशी विश्वासघात

## जिल्हा परिषद–पंचायत समिती निवडणुकीत भाजपला धडा शिकवा शुभम कळलावे यांचा थेट इशारा

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी/राजु गायकवाड :** उमरखेड विधानसभा क्षेत्रात ग्रामीण भागातील जनतेला गेल्या अनेक वर्षांपासून विकासाचे खोटे गाजर दाखवून सर्रास लुटले जात असल्याचा घणाघाती आरोप सामाजिक कार्यकर्ते शुभम कळलावे यांनी केला आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी भारतीय जनता पार्टीला "यावेळी ग्रामीण भागात धडा शिकवू" असा थेट इशारा दिला आहे."१५ वर्षांत आमदार बदलले, पण सत्ता बदलली नाही. आमदार चेहरा आहेत, कारभार मात्र पडद्यामागून चालतो," असा टोला लगावत कळलावे यांनी नाव न घेता भाजपा मुख्य नेत्यावर आरोप केला. "उमरखेडची संपत्ती लुटली जात असताना आमदार जनतेचे सेवक न राहता काही ठराविक लोकांचे गुलाम बनले आहेत," अशी जळजळीत टीका त्यांनी केली. नगरपरिषद निवडणुकीत शहरवासीयांनी भाजपला चांगलाच धडा शिकवला, तरीही सत्ताधाऱ्यांचे डोळे उघडले नाहीत, असा आरोप करत कळलावे म्हणाले, "शहरात नाकारले गेलेले राजकारण आता ग्रामीण भागात खपवून घेणार नाही. यावेळी खेड्यापाड्यातून भाजपला जागा दाखवली जाईल."भाजपने शिक्षण, आरोग्य, उद्योग, रोजगार आणि रस्ते यांचे मोठमोठे फलक लावले; मात्र प्रत्यक्षात शाळा ओस पडल्या, आरोग्य केंद्रे डॉक्टरविना चालू आहेत, उद्योग फक्त कागदावर आहेत आणि ग्रामीण रस्ते खड्ड्यांचे साम्राज्य बनले आहेत, असा घणाघात त्यांनी केला. "हा विकास नाही, ही विकासाच्या नावाखाली केलेली दिशाभूल आहे," असे त्यांनी ठणकावून सांगितले. ग्रामीण युवक बेरोजगारीने होरपळत आहेत, महिलांना आरोग्य सुविधांसाठी तालुक्याबाहेर धाव घ्यावी लागते आणि शेतकरी मूलभूत सुविधांसाठी झगडतो आहे, हे वास्तव भाजप सरकार झाकण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. "जनतेचे प्रश्न विचारले की विकासाची भाषणे ऐकवली जातात, पण प्रश्न सुटत नाहीत," अशी खोचक टिप्पणी त्यांनी केली आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका या केवळ निवडणुका नसून, सत्तेच्या माजाला उतरवण्याची संधी असल्याचे सांगत कळलावे यांनी ग्रामीण जनतेला आवाहन केले. "खरे विकास कामे, सामाजिक न्याय आणि जनतेच्या हक्कांसाठी यावेळी भाजपला स्पष्ट आणि ठोस उत्तर देण्याची वेळ आली आहे," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

# कोटनांद्रा येथे भक्तीचा जागर; श्रीनाथ महाराज गोसावींच्या कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** तालुक्यातील कोटनांद्रा येथील श्री अष्टसिद्धी विनायक गणपती संस्थानच्या वतीने आयोजित १३ व्या 'अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा' ज्ञानयज्ञ सोहळ्याने सध्या संपूर्ण पंचक्रोशीत भक्तीचा नवा चैतन्य निर्माण केला आहे. सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी, शनिवारी (दि. १७ जानेवारी) पैठणचे शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज यांचे १४ वे वंशज ह.भ.प. श्रीनाथ महाराज गोसावी (पैठणकर) यांची कीर्तनरूपी सेवा अत्यंत उत्साहात संपन्न झाली. त्यांच्या ओघवत्या वाणीतून प्रवाहित झालेल्या ज्ञानगंगेत भाविक चिंब भिजले.




कीर्तनासाठी महाराजांनी संत एकनाथ महाराजांच्या "आवडे देवासी तो ऐका प्रकार" या प्रसिद्ध अभंगाची निवड केली होती. देवाला नेमके काय आवडते, हे सांगताना त्यांनी मानवी जीवनातील नामाचे महत्त्व विशद केले. "केवळ बाह्य उपचार म्हणजे भक्ती नव्हे, तर अंतःकरणाची शुद्धता आणि भगवंताच्या नामाचा अखंड उच्चार हेच खऱ्या सुखी जीवनाचे रहस्य आहे," असे प्रतिपादन त्यांनी ज्ञानेश्वरी व भागवतातील विविध दाखले देऊन केले.आपल्या निरूपणात श्रीनाथ महाराजांनी एकनाथ महाराजांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "संत एकनाथ महाराज हे केवळ शांतीचे प्रतीक नसून ते वारकरी संप्रदायातील पहिले क्रांतिकारक संत होते. त्यांनी भारुड आणि अभंगांच्या माध्यमातून समाजातील विषमतेवर प्रहार केला."

कोटनांद्रा येथे या सोहळ्यात दररोज दुपारी ११ ते २ या वेळेत ह.भ.प. रामेश्वर महाराज मगर (नावडीकर) यांची रसाळ श्रीमद् भागवत कथा सुरू आहे. या आध्यात्मिक सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी समस्त कोटनांद्रा ग्रामस्थ, भजन मंडळी आणि तरुण मंडळ परिश्रम घेत आहेत. पंचक्रोशीतील भाविकांनी या ज्ञानयज्ञाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

# शासकीय रेखाकला परीक्षा महाराष्ट्र इंग्लिश स्कूलचा निकाल १०० टक्के

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड :** महाराष्ट्र शासन द्वारा आयोजित शासकीय रेखकला परीक्षा एलिमेंटरी आणि इंटरमिडीयेट परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून सदर परीक्षेत महाराष्ट्र इंग्लिश स्कूल मुळावा च्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ यश संपादन करून १०० टक्के निकाल लागलेला आहे.एलिमेंटरी परीक्षेत परीक्षेस बसलेले सर्वच्या सर्व 09 विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. त्यात दिव्यांशु प्रकाश वाळके , दिव्या नागोराव देशमुख , कोमल गजानन देशमुख ,




हर्षवर्धन प्रभाकर देशमुख , अमोघ अजय झरकर , श्वेता देवानंद पाचपुते , पायल प्रफुल व्यवहारे , सृष्टी अमोल पुलाते आणि रिया पंडितराव चव्हाण यांनी यश संपादन केले.इंटरमिडीयेट परीक्षेत परीक्षेला बसलेले सर्व 07 पैकी 07 विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. यात प्राप्ती प्रशांतराव देशमुख , श्रुती संजय वाकडे , सर्वज्ञ संजय वाकडे , सृष्टी संभाराव देशमुख आणि गौरंगी पुंडलिक जाधव , प्रतीक्षा विश्वनाथ कुरकुटे आणि लोपामुद्रा प्रकाश वाळके यांनी यश संपादन केले आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात यश मिळविण्यासाठी शाळेकडून मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी कला स्पर्धा , क्रीडा स्पर्धा , विज्ञान स्पर्धा अश्या अनेक संधी उपलब्ध केल्या जातात. विद्यार्थ्यांच्या यशासाठी शाळेचे अध्यक्ष अजय झरकर , प्राचार्य दीपा शिंदे , शिक्षक सुचिता हिंगाडे आणि सर्व पदाधिकारी व सर्व कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

# ताजनापूरच्या ऋषिकेश डोबाळे व राम डोबाळे ची निमलष्करी दलात निवड !

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/अकोट प्रतिनिधी :** स्वतःच्या प्रयत्नांच्या जोरावर अशक्य गोष्टीही शक्य करता येतात, हे अकोट तालुक्यातील ताजनापूर येथील दोन तरुणांनी सिद्ध करून दाखवले आहे. गावातील शेतकरी कुटुंबातील ऋषिकेश प्रमोद डोबाळे व राम सुभाष डोबाळे या दोन तरुणांची नुकतीच भारतीय निमलष्करी दलात निवड झाली आहे.

ऋषिकेश डोबाळे ची केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात व राम डोबाळे याची सीमा सुरक्षा दलात निवड झाल्याने संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे. ऋषिकेश व राम या दोघांचीही परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. घरची शेती कमी असतानाही मुलांच्या शिक्षणासाठी त्यांच्या वडिलांनी काही कमी पडू दिले नाही.

फेब्रुवारी २०२५ मध्ये पार पडलेल्या परीक्षेत या दोघांनीही घवघवीत यश संपादन केले होते. त्यानंतर ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेली



शारीरिक चाचणी आणि नोव्हेंबरमधील वैद्यकीय चाचणी यशस्वीरीत्या पार पाडली. नुकत्याच जाहीर झालेल्या अंतिम निकालात दोघांचेही नाव गुणवत्तेनुसार झळकले.

**गुलालाची उधळण आणि पेढे वाटून जल्लोष :**

या दैदिप्यमान यशाची बातमी समजताच ताजनापूर गावात आनंदाला उधाण आले. मित्रपरिवार आणि ग्रामस्थांनी गुलालाची उधळण करत आणि फटाके फोडून दोन्ही तरुणांचे जंगी स्वागत केले. गावात दोन्ही मुलांचे कौतुक होत आहे. दोघांनीही आपल्या या यशाचे श्रेय आई-वडिलांना दिले आहे.

# अमृतच्या व्याज परतावा योजनेचा सिल्लोडच्या उद्योजकाला मोठा आधार; ४४ हजारांचा लाभ!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था 'अमृत' (महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी) कडून राबविण्यात येणारी 'वैयक्तिक व्याज परतावा योजना' लघु उद्योजकांसाठी खऱ्या अर्थाने संजीवनी ठरत आहे. सिल्लोड येथील उद्योजक श्री. मंगेश खोंडे यांना या योजनेच्या माध्यमातून ४४ हजार ४७० रुपयांचा व्याज परतावा प्राप्त झाला असून, यामुळे तालुक्यातील नवउद्योजकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



सिल्लोड शहरातील शिक्षक कॉलनी परिसरातील 'व्यंकटेश मेडिकल अँड जनरल स्टोअर्स'चे संचालक मंगेश खोंडे यांनी व्यवसायाच्या विस्तारासाठी 'अमृत' योजनेअंतर्गत अर्ज केला होता. अमृतचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा उपव्यवस्थापक योगेश भास्करराव रोडे यांनी त्यांना या योजनेचे तांत्रिक बारकावे समजावून सांगत योग्य मार्गदर्शन केले. त्यानंतर चिखली अर्बन बँक, सिल्लोड यांच्यामार्फत खोंडे यांना १५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाले.

आपल्या व्यवसायाची घौडदौड सुरू ठेवत खोंडे यांनी कर्जाचे सर्व हप्ते वेळेवर भरले . याचीच फलश्रुती म्हणून शासनाकडून व्याजापोटी भरलेली ४४ हजार ४७० रुपयांची रक्कम थेट त्यांच्या बचत खात्यात जमा करण्यात आली. हा आर्थिक परतावा मिळाल्याबद्दल खोंडे यांनी समाधान व्यक्त करत जिल्हा उपव्यवस्थापक योगेश रोडे यांचा पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार केला.या योजनेच्या अधिक माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी अमृतचे जिल्हा उपव्यवस्थापक योगेश भास्करराव रोडे (९४०३२००६०६) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

> **"अमृत योजनेमुळे माझ्या सारख्या छोट्या व्यावसायिकाला मोठा आर्थिक आधार आणि आत्मविश्वास मिळाला आहे. शासनाच्या या योजना खरोखरच कौतुकास्पद असून, जास्तीत जास्त नवउद्योजकांनी याचा लाभ घ्यावा."**
> **— मंगेश खोंडे, लाभार्थी उद्योजक, सिल्लोड.**

# सोमजाई मंदिराच्या पटांगणात कबड्डीचा थरार; कर्नाळा स्पोर्ट्स पनवेलचे वर्चस्व

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित :** श्रीवर्धन तालुक्यातील क्रीडाप्रेमींसाठी अभिमानास्पद ठरलेल्या भव्य कबड्डी स्पर्धा सोमजाई कृपा क्रीडा मंडळ, श्रीवर्धन यांच्या वतीने रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने मोठ्या उत्साहात पार पडली. सोमजाई मंदिराच्या प्रशस्त व भव्य पटांगणात झालेल्या या स्पर्धांनी संपूर्ण परिसरात क्रीडासंस्कृतीचा जल्लोष निर्माण केला.

रायगड जिल्ह्यातील नामांकित आणि ताकदवान सोळा संघांच्या सहभागामुळे प्रत्येक सामना उत्कंठावर्धक ठरला. अंतिम सामन्यात उत्कृष्ट संघबांधणी, वेगवान चढाया आणि भक्कम बचावाच्या जोरावर कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल संघाने बाजी मारत प्रथम क्रमांकावर आपले नाव कोरले. दत्तात्रेय क्रीडा मंडळ पनवेल संघाने दमदार खेळ करत द्वितीय क्रमांक



पटकावला. सातत्यपूर्ण कामगिरीमुळे ऋतिक्षा पेण संघाने तृतीय, तर सुवर्ण गणेश दिवेआगर संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.

वैयक्तिक पुरस्कारांनीही स्पर्धेची शोभा वाढवली. बचावात अफलातून पकडी दाखवणाऱ्या हर्षिता चव्हाण (दत्तात्रेय क्रीडा मंडळ पनवेल) हिला उत्कृष्ट पक्कड पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आक्रमक आणि अचूक चढायांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या मलिका शिंदे (ऋतिक्षा, पेण) हिला उत्कृष्ट चढाईचा मान मिळाला. संपूर्ण स्पर्धेत नेतृत्वगुण, तांत्रिक कौशल्य आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर नंदिनी वाघे (कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल) हिला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन डॉ. मधुकर ढवळे सर यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी अनंत गुरव, शमा पोरनाक, अंजली भाटकर, बाळकृष्ण चाचले, सुप्रिया चोगले, बाळकृष्ण गोरनाक, शिवानी चौले, डॉ. अमृता श्रीवर्धनकर, राजेश्री मुरकर, प्रविता माने यांची प्रमुख उपस्थिती होती. बक्षीस वितरण सोहळा सचिन येलवे, पत्रकार राजू रिकामे आणि रायगड जिल्हा कुमारी गट प्रशिक्षक रोहित राणे यांच्या हस्ते पार पडला.उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि खेळाडूंनी दाखवलेली क्रीडावृत्ती यामुळे ही स्पर्धा केवळ कबड्डीची लढत न राहता रायगड जिल्ह्यातील महिला कबड्डीच्या उभारणीसाठी एक प्रेरणादायी पर्व ठरली. सोमजाई कृपा क्रीडा मंडळाच्या या उपक्रमामुळे श्रीवर्धनचे नाव क्रीडा नकाशावर अधिक ठळकपणे अधोरेखित झाले आहे.

# ग्रीन नेचर फाउंडेशन तर्फे लाखनी नेचर पार्कवर पर्यावरणस्नेही पतंग स्पर्धा

## विद्यार्थ्यांनी दिला नायलॉन मांजा टाळा,पशुपक्ष्यांना वाचवाचा संदेश; महिलांना वृक्षवाणाचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा :** लाखनी येथील ग्रीन नेचर फाउंडेशन अर्थात ग्रीनफ्रेंड्स नेचर क्लब लाखनी तर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा पर्यावरणस्नेही मकरसंक्रांत सण साजरी करण्यात आली. यामध्ये विशेषता नायलॉन मांजाचे दुष्परिणाम सांगणारी पर्यावरणस्नेही पतंग स्पर्धाचे आयोजन लाखनी बसस्थानकावरील नेचर पार्कवर करण्यात आले.त्याचबरोबर पर्यावरणस्नेही मकरसंक्रांतिच्या निमित्ताने महिलांना वृक्षवाण म्हणून दरवर्षीप्रमाणे यावर्षी पण शोभिवंत पुष्परोपे ग्रीन नेचर फाउंडेशनच्या कार्यालयात महिलांना देण्यात आले.




नेचर पार्कवरील पर्यावरणस्नेही पतंग बनवा स्पर्धेत ताजुश शरिया कोचिंग क्लासेसचे विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर पक्षी व प्राणी आकारात व नायलॉन मांजा दुष्परिणाम यावर आधारित घोषवाक्य लिहून पतंग सजावट केले. यावेळी प्रा.अशोक गायधने सरांनी नायलॉन मांज्यामुळे भारतात दरवर्षी जीवित हानी होणाऱ्या पक्षी,प्राणी व मानवी हानीची सांख्यिकी माहिती दिली. या कार्यक्रमाला ग्रीन नेचर फाउंडेशनचे पदाधिकारी ज्येष्ठ नागरिक भैय्याजी बावनकुळे,अशोक वैद्य व अशोक नंदेश्वर तसेच ताजूश शरिया कोचिंग क्लासेसचे संचालिका मिनाझ मोटलानी व प्रा. डॉ.अर्चना गायधने यांनी सुद्धा समयोचित मार्गदर्शन केले.यावेळी सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी लाखनी नेचर पार्कवर नायलॉन मांजा टाळा व पशुपक्ष्यांना वाचवा असा उद्घोष करून प्रवाशांना व नागरिकांना पर्यावरणस्नेही मकरसंक्रांतीचा संदेश दिला. इकोफ्रेंडली पतंग सजावट स्पर्धेत प्रायमरी गटात प्रथम क्रमांक सहेरिश सैय्यद व सुमती बजाज हिला प्राप्त झाला तर द्वितीय क्रमांक नायरा पाटील व आल्फिया दयाला यांना तर तृतीय क्रमांक लावण्या निर्वाण व उमैर छवारे यांना तर प्रोत्साहनपर क्रमांक जैनब छवारे, इनाया छवारे व आराध्या आगलावे यांना प्राप्त झाला तर सहभागपर क्रमांक अभिधा थोटे हिला मिळाला.

मिडलस्कुल गटात प्रथम क्रमांक निराली वंजारी व जान्हवी निर्वाण यांना तर द्वितीय क्रमांक कनक गुरुनानी व अश्मिरा आकबानी यांना तर तृतीय क्रमांक काव्या धंधुकिया व अन्विक्षा थोटे यांना तर प्रोत्साहनपर क्रमांक मिताली गायधनी व आरोही कावळे यांना प्राप्त झाला. स्पर्धेचे परीक्षण प्रा.डॉ.अर्चना गायधने व मिनाझ मोटलानी यांनी केले.

मकरसंक्रांत निमित्ताने वृक्षवाण म्हणून ग्रीन नेचर फाउंडेशन व ग्रीनफ्रेंडस नेचर क्लब तर्फे अनेक महिलाना पुष्परोपे प्रा. डॉ अर्चना गायधने यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.यामध्ये पुष्पा भुरे, सुमन आगलावे, किर्ती आगलावे,शालिनी थोटे, पुष्पा रोडे, भांडारकर मॅडम, सुन्ने मॅडम, पल्लवी पाटील, ज्योती वैद्य, ममता गायधने, जयश्री नंदेश्वर,प्रा. स्नेहलता बोरकर, योगिनी गभने इत्यादी अनेक महिलांना पुष्परोपे वृक्षवाण म्हणून देण्यात आले

---

# रॅली चालू असताना तिघांकडील सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** विजयी झालेल्या नगरसेवकांच्या रॅली दरम्यान तिघा जणांच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि मणी मंगळसूत्र चोरीला गेल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात 16 जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.जय चंद्रन के वासू हे सेक्टर 12, नवीन पनवेल या ठिकाणी राहत असून 16 जानेवारी रोजी व्हीके हायस्कूल, पनवेल येथे मतमोजणीच्या ठिकाणी आले होते. उमेदवार निवडून आल्याने प्रभागातील लोकांनी वडाळे तलाव या ठिकाणी रॅली काढली. रॅली चालू असताना त्यांच्या गळ्यातील तीन तोळ्याची सोन्याची चैन गळ्यामध्ये मिळून आली नाही. रॅलीमध्ये शोध घेतला मात्र ती सापडली नाही. याच दरम्यान रॅलीमध्ये त्यांच्यासोबत असणाऱ्या शैला चनवीर (राहणार सेक्टर 13 नवीन पनवेल) यांच्या गळ्यातील एक तोळे वजनाची सोन्याचे मणी मंगळसूत्र चोरीला गेले. तसेच निलेश पगारे (राहणार डीएव्ही हायस्कूल जवळ नवीन पनवेल) यांच्या गळ्यातील एक तोळ्याची सोन्याची चैन चोरीला गेली.

# 47 हजारांची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** दोन बहुरूपी इस्मानी 28 वर्षीय तरुणाकडील 47 हजार रुपये चोरल्या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात 16 जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अरविंद धोत्रे हा देवदगाव येथे राहत असून तो 16 जानेवारी रोजी मतमोजणी कार्यालयापासून 100 मीटर अंतरावर पनवेल महानगरपालिका नवीन इमारत, छोटा खांदा गाव रस्ता, काळसेकर कॉलेजच्या बाजूला, पनवेल या ठिकाणी मांडवात बसला होता. त्यावेळी एका इसमाने त्याच्या खिशात हात घातला आणि पैसे काढत असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्या महिलेस पकडले असता त्यांनी त्याच्याकडील पैसे दुसऱ्या महिलेला दिल्याचे दिसले. या महिलांना पकडून कामोठे पोलिसांचे ताब्यात देण्यात आले. या महिला बहिरूपी असल्याचे पोलिसांनी चौकशी केल्यावर लक्षात आले. संजय मुळे आणि सुनील मुळे (राहणार सेक्टर 9, कळंबोली, झुडिओ जवळील झोपडपट्टी) अशी दोघांची नावे आहेत.

# पोलीस असल्याचे सांगून 13 लाख 25 हजार रुपये चोरले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पोलीस असल्याचे भासवुन पाच ते सहा जणांनी डॉक्टरांकडील 13 लाख 25 हजार रुपये लुटून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

डॉक्टर मनीष शिंदे हे सांगली येथे राहत असून ते साखर खरेदी विक्रीचा व्यापार करतात. कॅनरा बँक समोरील रस्त्यावर सेक्टर 20 खारघर येथे रस्त्यावरून चालत जात होते यावेळी सफेद रंगाची एर्टिगा गाडीतून पोलिसांप्रमाणे हातात काठी असलेले आणि गाडीमध्ये पोलीस कॅप असलेले अनोळखी पाच ते सहा उतरले आणि त्यांनी डॉक्टराला पोलीस असल्याचे भासवले आणि हातातील 13 लाख 25 हजार रुपये असलेले पिशवी ते घेऊन गेले.

# सिमेंट बलकरची मोटरसायकलला धडक, एकाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** सिमेंट बलकरने मोटरसायकलला दिलेल्या धडकेत 66 वर्षीय अशोकन मादा पाटील यांचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी सिमेंट बलकर क्रमांक एम एच 46 बी यु 7572 वरील चालका विरोधात खारघर पोलीस ठाण्यात 16 जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.16 जानेवारी रोजी दुपारी दोनच्या सुमारास अशोकन मादा पाटील हे त्यांची मोटरसायकल क्रमांक एम एच 43 एस 4296 ही घेऊन जात होते. यावेळी उत्सव सर्कल, खारघर या ठिकाणाहून सिमेंट बलकरने भरधाव वेगाने येऊन त्यांच्या मोटरसायकलला धडक दिली आणि त्यात अशोकन गंभीर जखमी होऊन त्यात त्यांचा मृत्यू झाला.

# जय लहुजी दिनदर्शिकेचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**



**मुंबई / रमेश औताडे :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर मानखुर्द येथील क्रांतीसम्राट डॉ. बाबासाहेब गोपले भवन येथे ४४ व्या मातंग समाज क्रांतीचक्र परिवर्तन दिनानिमित्त क्रांतीज्योती कुसुमताई बाबासाहेब गोपले यांच्या हस्ते जय लहुजी दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.मातंग समाजाचे नेते समाजभूषण सुदाम आवाडे , बी जी गायकवाड, मदन आवाडे, योगेश शिंदे,बंडु चांदणे, तुलसिराम ताटे, नितिन हिवाळे, हरीभाऊ कांबळे , दत्तात्रय आवाडे , रवी थोरात, पार्वती आवाडे, अश्विनी शिंदे , द्वारकाबाई लोंढे, आदी मान्यवर उपस्थित होते.

---

# करंजाडे येथील अंडरपास कामाची सरपंच मंगेश शेलार यांनी केली पाहणी

■ अंडरपास मुळे नागरिकांच्या वेळेची व इंधनाची होणार बचत.. जनतेत आनंदाचे वातावरण

■ आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर,सरपंच मंगेश शेलार यांच्या प्रयत्नांना यश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल–जेएनपीटी रेल्वे मार्गावरील करंजाडे येथील रखडलेल्या भुयारी मार्गाचे (अंडरपास) काम अखेर अंतिम टप्प्यात आले असून लवकरच या अंडरपास चालू होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला लोकनियुक्त सरपंच मंगेश शेलार यांच्यासह स्थानिक नागरिक व रेल्वे अधिकाऱ्यांनी कामाची संयुक्त पाहणी रविवार, दिनांक १८ जानेवारी रोजी सरपंच व नागरिकांनी अंडरपास रोडची पाहणी केली आहे

गेल्या काही वर्षांपासून या भुयारी मार्गाचे काम प्रलंबित असल्यामुळे रेल्वे फाटकामुळे वाहनचालकांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत होता. मालगाड्यांची सतत ये-जा असल्याने फाटक वारंवार बंद राहत होते, परिणामी नागरिकांचा वेळ व इंधनाचा अपव्यय होत होता.

करंजाडे परिसराचा झपाट्याने विकास होत असून, करंजाडे कॉलनीचा विस्तार,



महात्मा फुले कॉलेज, तसेच नुकतेच उद्घाटन झालेल्या आंतरराष्ट्रीय नवी मुंबई विमानतळामुळे या भागाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. वाढती लोकसंख्या आणि वाहतूक लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने हा भुयारी मार्ग हाती घेतला होता.

आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर तसेच करंजाडेचे लोकनियुक्त सरपंच मंगेश शेलार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या कामाला गती मिळाली असून सध्या काम अंतिम टप्प्यात आहे लवकरच अंडरपास सुविधा चालू होईल असे प्रतिक्रिया लोकतयुक्त सरपंच मंगेश शेलार यांनी दिली आहे

फाटकामुळे होणारा प्रवासातील विलंब टळणार असून, नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे करंजाडे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व आनंदाचे वातावरण आहे.

**पाहणीवेळी उपस्थित**

या पाहणीप्रसंगी लोकनियुक्त सरपंच मंगेश दादा शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, रेल्वे अभियंता निलेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुनील भोईर, माजी सदस्य नाथाभाई भारवाड, प्रथमेश पुंडे, बाबासाहेब भोसले, रामचंद्र महाडिक, सुदर्शन कवडे, ज्योती तातरे, सुषमाताई मयेकर, संतोष विखारे, कैलास शेलार, कांता गायकवाड, रश्मी शुक्ला, जयवंत भुजबळ, दिलीप गुंड, विवेक भोसले, अमोल मेने आदी मान्यवर उपस्थित होते.

अंडरपासमुळे सेवा लवकर चालू होणार असल्यामुळे करंजाडे जनतेत आनंद पाहायला मिळत असून नागरिकांनी आमदार महेश बालदी,आमदार प्रशांत ठाकूर व सरपंच मंगेश शेलार यांचे आभार मानले.

---

# वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम 2026 साठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसकडे रवाना

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादक :** महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे नेण्याचा वेग अधिक वाढवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम (WEF) 2026 मध्ये सहभागी होण्यासाठी दावोस, स्वित्झर्लंडकडे रवाना झाले आहेत. या परिषदेसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमवेत उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

जागतिक व्यासपीठावर भारताचे विकास इंजिन म्हणून 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' अधिक बळकट करण्याचा निर्धार असून जग या नव्या 'महा-ग्रोथ' गाथेकडे अपेक्षेने पाहत आहे. महाराष्ट्राची १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल अधिक वेगवान



करण्यासाठी WEF 2026 महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. गेल्यावर्षी 16 लाख कोटींचे गुंतवणूक करार महाराष्ट्राने केले होते. यावर्षी अधिक गुंतवणूक आणण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठेवले आहे.

दावोस येथे होणाऱ्या या परिषदेदरम्यान जागतिक उद्योगसमूह, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी चर्चा करून महाराष्ट्रात थेट विदेशी गुंतवणूक, औद्योगिक प्रकल्प, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

---

# कॉंग्रेस तगडे आणि अभ्यासू उमेदवार देणार : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** महापालिका आणि नगरपालिकांत कॉंग्रेसला चांगले यश मिळाले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी तगडे आणि अभ्यासू उमेदवार कॉंग्रेस पक्ष उभे करेल. या निवडणुकांत तरुणांना संधी दिली जाईल. महाविकास आघाडी म्हणून या निवडणुका लढवल्या जातील. शक्य असेल तिथे कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन स्वबळावर उमेदवार उभे केले जातील. त्यामुळे निश्चितच रायगडमध्ये कॉंग्रेसला चांगले यश मिळेल. कार्यकर्त्यांनी सकारात्मक विचार करावा, असे कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले. शेलघर येथे शनिवारी (ता.



१७) आढावा बैठक झाली. त्यात संभाव्य उमेदवारांची चाचपणी करण्यात आली.

यावेळी राणीताई अग्रवाल म्हणाल्या, "कॉंग्रेस फक्त पक्ष नाही तर विचारधारा आहे. ती संपणार नाही. कार्यकर्त्यांत उत्साह आहे. महेंद्रशेठ घरत हे जिंदादिल आहेत. त्यांनी कार्यकर्त्यांना बळ दिले आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांचाच निवडणुकीसाठी विचार व्हावा, बाहेरून ऐनवेळी कॉंग्रेसमध्ये आलेल्यांना तिकीट मिळणार नाही."

यावेळी अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी आपापल्या भावना व्यक्त केल्या.यावेळी रायगडच्या प्रभारी राणीताई अग्रवाल, निरीक्षक मनीष गणोरे, सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, नंदराज मुंगाजी, मनीष पाटील, वसंत काठावले, हेमराज म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, अलिबाग येथे कॉंग्रेसची शुक्रवारी (ता. १६) आढावा बैठक झाली. महेंद्रशेठ घरत हे अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले, "जे कॉंग्रेसमध्ये आहेत त्या सर्वांचे अभिनंदन! आपण जिंकू शकतो, अशक्य काहीच नाही, अंतुले साहेबांचा बालेकिल्ला आहे. कार्यकर्त्यांच्या, पदाधिकाऱ्यांच्या भावनांचा निश्चितच आदर केला जाईल. त्यांना विश्वासात घेऊनच आपण निवडणुका लढवू. जर एखाद्या तालुक्यात स्वबळावर लढण्याची परिस्थिती असेल तर त्या पदाधिकाऱ्यांना स्वातंत्र्य दिले जाईल. त्यामुळे मनात आणले तर आपण निश्चितच चांगल्या जागा जिंकू शकतो."

यावेळी राजाभाऊ ठाकूर म्हणाले, "जनादेश आहे त्यांना एबी फार्म द्या, हा जिल्हा कॉंग्रेसचा आहे. महेंद्रशेठ घरत पॉवरबाज आहेत, ते काहीही करू शकतात. ज्या जागा लढवू त्या जिंकणारच."

सोशल मीडियाचा वापर आवश्यक आहे. साम, दाम, दंड वापरून ते जिंकतात, आपली विचारधारा लोकशाही मार्गाने जाणारी आहे. काळ खूप कठीण आहे, पण खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे. यावेळी कॉंग्रेसचे विभागीय अध्यक्ष, कार्यकर्ते, अलिबाग जिल्हा निरीक्षक शाह आलम, प्रदीप रावत, इस्माईल घोले आदी उपस्थित होते.

---

# नागपूरचा ऐतिहासिक विजय -जनतेच्या विश्वासाला समर्पित!

**दैनिक युवक आधार**

**दयाशंकर तिवारी**

**भाजप शहर अध्यक्ष नागपूर :** नागपूरच्या विकासाचे शिल्पकार माननीय नितीनजी गडकरी,मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या खंबीर नेतृत्वात नागपूरचा जो कायापालट झाला, तो जनतेने मनापासून स्वीकारला आहे. नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली महापौरांनी हे विकासकाम तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवले आणि जनतेचे प्रश्न थेट वरिष्ठांपर्यंत मांडून ते मार्गी लावले.या निवडणुकीत आमच्या सर्वच वरिष्ठ नेत्यांनी जनतेशी थेट संवाद ठेवला. माननीय नितीनजी गडकरी यांनी सुमारे ३० सभा घेतल्या, देवेंद्रजींनी ५ सभा, टॉक शो आणि बाईक रॅलीच्या माध्यमातून जनसंपर्क साधला, तर चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी २० हून अधिक सभांमधून संवाद



साधला. यासोबतच कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक भेटींवर दिलेला भर आणि घेतलेली अपार मेहनत आज विजयात परावर्तित झाली आहे. नागपूरच्या जनतेने भारतीय जनता पार्टीला भरभरून प्रेम दिले,शहराला केंद्रीय मंत्री दिले, मुख्यमंत्री दिले आणि महापौरही दिले.

त्यांच्या याच विश्वासामुळे आम्ही विकासकामे करू शकलो. नागपूरकरांनी भाजपाला सलग दुसऱ्यांदा 'शतकवीर' करून जो कौल दिला आहे, तो आम्हा सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. हा विजय आम्ही नागपूरच्या जनतेला समर्पित करतो आणि त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सोयगाव पंचायत समितीच्या आदर्श ग्रामसेवकाचा सन्मान

## ३३ वर्षांच्या प्रामाणिक सेवेला विस्तार अधिकारी (कृषी) पदोन्नतीची पावती

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** ग्रामीण विकासाच्या ध्यासाने अखंड ३३ वर्षे प्रामाणिक,निष्ठावंत व लोकाभिमुख सेवा बजावणाऱ्या सोयगाव पंचायत समितीतील आदर्श ग्रामसेवक यांचा आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.त्यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय कार्यपद्धती, शेतकरी-केंद्रित दृष्टिकोन आणि ग्रामविकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत त्यांना विस्तार अधिकारी (कृषी) या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.



ग्रामविकास,कृषी विकास,शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, शेतकऱ्यांशी थेट संवाद,पारदर्शक प्रशासन आणि लोकसहभाग यामुळे त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक गावांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणले. त्यांच्या कार्यशैलीमुळे ग्रामपातळीवर शासनाबद्दल विश्वास निर्माण झाला असून ते अनेक तरुण ग्रामसेवकांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत.या गौरव व पदोन्नतीबद्दल गटविकास अधिकारी सोयगाव शिवाजी यमुलवाड,विस्तार अधिकारी अशोकराव दोड, ग्रामसेवक संघटनेचे सचिव सुनील मंगरूळे, तांत्रिक संघटनेचे कोषाध्यक्ष महेंद्र निकम,श्रीकांत पाटील,विकास शिरसागर,गणेश गवळे,सत्यनारायण कुलेवाड,एस. एस.पाटील,गणेश स्वैर,संजय गवळे,तसेच पंचायत समितीतील कार्यालयीनकर्मचारी,तालुक्यातील सर्व ग्रामसेवक व अधिकारी यांच्यासह इतर मान्यवरांनी शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.व गटविकास अधिकारी यमुलवार बोलताना उपस्थित अधिकाऱ्यांनी सांगितले की, “अशा निष्ठावंत आणि कार्यक्षम अधिकाऱ्यांमुळेच ग्रामीण प्रशासन अधिक सक्षम होते. त्यांची ही पदोन्नती म्हणजे प्रामाणिक सेवेचा सन्मान असून पंचायत समितीसाठी अभिमानास्पद बाब आहे.”नवीन पदावरही ते शेतकरी हित,कृषी विकास आणि ग्रामीण समृद्धी यासाठी अधिक जोमाने कार्य करतील, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छा देण्यात आल्या...

# ग्राम कुंभी येथे टीबी मुक्त ग्रामपंचायत व सिकलसेल ॲनिमिया संदर्भात जनजागृती उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/रणजितसिंह ठाकुर :** तालुक्यातील ग्राम कुंभी येथे दिनांक17 जानेवारी 2026 रोजी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, मंगरूळपीर अंतर्गत प्राथमिक उपवर्धिनी आरोग्य केंद्र, कुंभी यांच्या वतीने टीबी मुक्त ग्रामपंचायत अभियान व सिकलसेल ॲनिमिया जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंभी व श्री. एन. बी. शेळके माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कुंभी येथील विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थ नागरिकांना क्षयरोग (टीबी) व सिकलसेल ॲनिमिया संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रम हा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ अनिल कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.सतीश परभणकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.विजय काळे, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मंगरूळपीर तालुका आरोग्य अधिकारी डॉ.धनश्री जाधव मॅडम, कार्यक्रम अधिकारी समाधान




लुमसूने, कार्यक्रम निरीक्षक रामदास गवई, कार्यक्रमाधिकारी जयकुमार सोनुने यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

यावेळी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या क्षयरोग विभागाचे वरिष्ठ पर्यवेक्षक श्री. संतोष बल्लाळ यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, “क्षयरोग हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो, मात्र त्यासाठी वेळेवर तपासणी व नियमित उपचार घेणे अत्यंत आवश्यक आहे. दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला, ताप, वजन घटणे, भूक न लागणे अशी लक्षणे आढळल्यास त्वरित आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी. शासनामार्फत टीबी रुग्णांसाठी मोफत तपासणी व उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. नागरिकांनी गैरसमज दूर करून आजार लपवू नये, तर उपचार पूर्ण करून टीबी मुक्त ग्रामपंचायत घडविण्यास हातभार लावावा.”कार्यक्रमात तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मंगरूळपीर वरिष्ठ पर्यवेक्षक क्षयरोग विभाग संतोष बल्लाळ, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सरनाईक, क्षेत्र कार्य अधिकारी पी.पी.एस.ए.प्रदीप पट्टेबहादूर, आरोग्य सेवक चिरमाले, आरोग्य सेविका सुजेता राठोड व आशा सेविका उपस्थित होत्या.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुख्याध्यापक मुसळे व श्री. एन. बी. शेळके माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यानंतर टीबी मुक्त भारत अभियान व टीबी मुक्त ग्रामपंचायत अंतर्गत जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुख्याध्यापक मुसळे, श्री. शेळखे विद्यालयचे मुख्याध्यापक महादेव काळे, शिक्षक प्रमोद बोलके,सुनील तडस, अनिल कारंजकर, शिवाजी केंद्रे,प्रल्हाद हांबरे, संतोष माहुरे,अनुताई इंगळे,संजय भगत, गणपत जाधव,अनिल बेंद्रे,तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी, सर्व शिक्षक-शिक्षिका तसेच ग्रामस्थ नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. तसेच यावेळी १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान राबविण्यात येणाऱ्या सिकलसेल ॲनिमिया मुक्त विशेष अभियान संदर्भात विद्यार्थ्यांना सिकलसेल आजाराची माहिती, तपासणीचे महत्त्व व प्रतिबंधात्मक उपाय याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्राम कुंभी परिसरात आरोग्यविषयक जनजागृती वाढण्यास मदत झाली असून, टीबी व सिकलसेल ॲनिमिया मुक्त समाजनिर्मितीसाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.


# सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटात सौ माधुरी सागर भिसे यांची उमेदवारी !; गटातील स्थानिक युवक मतदारांमध्ये आनंदाचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर लासुर्णे जिल्हा परिषद निवडणुकीसाठी परिसरात राजकीय हालचालींना वेग आला असून तरुण नेतृत्व म्हणून युवा उदयोजक मा. सागर बाळासाहेब भिसे यांच्या पत्नी सौ माधुरी सागर भिसे यांच्या नावाची चर्चा सध्या युवकांमध्ये जोरात सुरु आहे. सामाजिक बांधिलकी लोकसंपर्क व विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे स्थानिक युवकांच्यात सागर बाळासाहेब भिसे यांच्यावर वाढता विश्वास मतदारांमध्ये दिसून येत आहे काही वर्षांपासून गावा गावातील युवकांना नोकरीच्या पाठीमागे न लागता स्वतःचा व्यवसाय करावा अश्या प्रकारचे मार्गदर्शन करण्यात येत असल्यामुळे व भरपूर युवकांना रोजगारासाठी मदत केली असल्यामुळे मा सागर भिसे यांच्यावर गावागावातील युवकांचा वेगळाच विश्वास निर्माण झाला असल्याचे युवकांमध्ये चर्चा आहे

मा.सागर बाळासाहेब भिसे हे विविध सामाजिक,शैक्षणिक आणि क्रीडा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागी होत असून दुर्बल युवकांना एकत्र करून ग्रामविकासाची दिशा दाखवत असतात.गावातील रस्ते पाणीपुरवठा शिक्षण आणि आरोग्यविषयक समस्या





दूर करण्यासाठी त्यांनी सातत्याने कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. युवा,उत्साही आणि स्वच्छ प्रतिमेचे युवा नेतृत्व म्हणून मा.सागर बाळासाहेब भिसे यांच्या उमेदवारीमुळे स्थानिक युवक वर्ग शेतकरी आणि महिला मंडळांकडे चाचपणी केली असता त्यांच्या उमेदवारीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. गावाच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न आणि लोकसेवा हीच माझी दिशा असेल असे मत इच्छुक उमेदवार मा.सागर बाळासाहेब भिसे यांनी व्यक्त केले सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटातील उमेदवारीमुळे बेलवाडी सणसर भवानीनगर थोरातवाडी लासुर्णे बंबाडवाडी परिसरातील मतदारांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे स्थानिक युवकांचा कल आणि जनसंपर्क पाहता ही निवडणूक मा.सागर बाळासाहेब भिसे यांच्या बाजूने होण्याची चिन्हे आताच दिसत आहेत.

# भवानीनगर येथील महागणपतीच्या गणेश जयंती व वर्धापनदिनी विशेष कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** भवानीनगर ता.इंदापूर येथील श्री छत्रपती सह.सा कारखाना व श्री महागणपती व्यापारपेठ मंडळाच्या संयुक्तपणे गणेश जयंती व वर्धापनदिना निमित्त चार दिवशीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सोमवार दि.19 जानेवारी पासून गुरुवार दि 22 जानेवारी पर्यंत हभप आकाश महाराज गरगडे,हभप दिलीप महाराज कदम,हभप सोनालीताई करपे यांची कीर्तन सेवा तर भारूडरत्न राष्ट्रीय पुरस्कार



विजेते बाळूमामा चरित्रकार हभप शिवाजी महाराज शेळके यांची भारूड सेवा आयोजित केली असल्याची माहिती व्यापारपेठ मंडळा मार्फत देण्यात आली.

श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या सहकार्य व महागणपती व्यापारपेठ मंडळ यांनी परिसरातील ग्रामस्थ सभासद कामगार व्यापारी यांच्यासाठी गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली त्याला 29 वर्ष पूर्ण झाली असल्यामुळे या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे महागणपती व्यापारपेठ मंडळ यांच्या माध्यमातून बुधवार व गुरुवार या दोन दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# संघर्ष रडवतो पण आयुष्य घडवतो’ — कवली चा गजानन केंडेंची प्रेरणादायी यशोगाथा

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** तालुक्यातील कवली येथील प्रगतिशील शेतकरी भुजंगराव केंडे, पाटील यांचे चिरंजीव गजानन केंडे,पाटील यांनी केंद्रीय राखीव दलात (CRPF) निवड होऊन आपल्या जीवनातील संघर्षाचे सोने केले आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत,अनेक अडचणींना सामोरे जात त्यांनी कठोर परिश्रमाच्या बळावर हे यश मिळवले. मर्यादित साधनसंपत्ती,कठीण परिस्थिती आणि सातत्याने



केलेली धडपड असूनही ध्येयापासून न ढळता गजानन केंडे यांनी आपले स्वप्न साकार केले.शिस्त,चिकाटी आणि आत्मविश्वास या गुणांच्या जोरावर त्यांनी केंद्रीय राखीव दलात स्थान मिळवून परिसरातील तरुणांसमोर आदर्श ठेवला आहे.

गजानन केंडेंच्या या उल्लेखनीय यशामुळे कवली गावासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे. ग्रामस्थ,नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.त्यांची ही यशोगाथा आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असून,कठोर परिश्रम आणि निष्ठा असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नाही, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे.त्याच्या यशा बद्दल मराठा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष सोपान दादा गव्हाडे,पाटील,वसंत नाईक निबांयती महाविद्यालयचे मुख्याध्यापक यशवंत चौधरी, यांनी अभिनंदन केले व पुढील कारकिर्दीत शुभेच्छा दिल्या.

# कोल्हापूर येथे भरणाऱ्या अखिल भारतीय मानवतावादी साहित्य संमेलनासाठी युवा साहित्यिक अर्जुन जाधव निमंत्रित कवी

**दैनिक युवक आधार**

**ठाणे / प्रतिनिधी :** महाराणी ताराबाई, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पाऊलखुणानी पावन झालेल्या आणि कलाकारांची , कुस्तीगीराची नगरी, ऐतिहासिक नगरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या कोल्हापूर नगरीत यंदा रविवार दि. २५ डिसेंबर २०२६ रोजी एक दिवशी अखिल भारतीय मानवतावादी साहित्य संमेलन भरत असून या साहित्य संमेलनासाठी कोल्हापूराचे सुपुत्र युवा साहित्यिक अर्जुन विष्णू जाधव यांची निमंत्रित कवी म्हणून निवड करण्यात आली आहे.

अर्जुन जाधव हे आपल्या साहित्यातून सदैव वास्तववादी विषयावर सामाजिक जनजागृती आणि जन प्रबोधन लेखन करणारे नव्या दमाचे साहित्यिक म्हणून



परिचित आहेत. बेळगाव सीमा संदर्भात ते सतत बेधडकपणे लिखाण करणारे सीमाभागातील लढवय्ये साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहेत.

त्याची आजपर्यंत विविध विषयावर ' बेळगाव कुणाच्या बापाच, जागर, बागलकोटची सुगंधा,माझा बाप उद्ध्वस्त गिरणी कामगार,लेक जगवा लेक शिकवा, व्यसनमुक्ती, प्रेयसी एक आठवण..' आदी पुस्तके प्रसिद्ध झालेली असून महाराष्ट्र शासनाच्या मराठी वाङ्मय पुरस्कारासह अनेक पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले आहे. त्यांचे ' बेळगाव कुणाच्या बापाच ' हे बेळगाव सीमा भागावरील पुस्तक अत्यंत गाजलेले आहे तसेच ' प्रेयसी एक आठवण.. ' हे सत्य प्रेम स्वरूप पुस्तक सद्या गाजत आहे. ' बाप चालतो घराची वाट...' हे पुस्तक लवकरच प्रकाशित होणार.

कोल्हापूर नगरीत भरणाऱ्या अखिल भारतीय मानवतावादी साहित्य संमेलनासाठी निमंत्रित कवी म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे कौतुक केले जात आहे.

# "संस्कार इंग्लिश मीडियमच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रमातून दिले जात आहेत संस्काराचे धडे"

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी/(रघुनाथ देवकर) :** पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील प्रथमपासूनच संस्कार इंग्लिश मीडियम भाळवणी यांच्या माध्यमातून विद्यार्थी वर्गाला संस्थेच्या संस्काररूपी विचाराची झालर पांघरून सतत शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्राबरोबरच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत यशो मालिकेचे शिखर गाठण्यासाठी अध्यक्ष प्रा. सचिन उपाध्ये प्रिन्सिपल सौ गीतांजली उपाध्ये मॅडम त्याचबरोबर कर्तव्यदक्ष स्टाफ आणि संस्थेचे संचालक यांनी आपल्या कर्तृत्वातून संस्थेच्या माध्यमातून गरुड भरारी झेप घेतल्याचे दिसून येत आहे. आधुनिकतेच्या जगामध्ये बालकांना आपल्या आई-बाबांबरोबरच आजी आजोबा व इतर नात्याचा सुद्धा लळा लागला पाहिजे त्यांचे प्रेम मिळाले पाहिजे त्यांच्याबद्दल मनामध्ये आत्मियता



निर्माण झाली पाहिजे या उद्देशाने "आजी आजोबा कृतज्ञता दिवस अतिशय उत्साही वातावरणामध्ये साजरा करून प्रत्यक्ष नातवांच्या मनी आजी-आजोबांचे प्रेम कसे उत्पन्न झालं पाहिजे याबाबतचे प्रात्यक्षिक या कार्यक्रमाद्वारे सर्व विद्यार्थ्यांच्या आजी-आजोबांना आमंत्रित करून त्यांचे स्वागत कमानी पासून शाळेतील वर्गापर्यंत त्यांच्यावरती पुष्पांचा वर्षाव करून नाचत बागडत अतिशय उत्साहाने स्वागत करण्यात आले. आणि सर्व बालक विद्यार्थ्यांनी आपल्या आजोबांचे पद्म पूजन आणि औक्षण करण्यात आले. अशा या विलोभनिय कार्यक्रमानेआज्जि आजोबांचे अंतकरण आनंदाश्रुनी भरभरून आले आणि त्या क्षणी त्या सर्व आजी-आजोबांनी आपल्या नातवांना भरभरून व अंतकरणपूर्वक आशीर्वाद दिल्याचा क्षण पाहताच उपस्थित शिक्षक वृंद व ग्रामस्थांना भरभरून आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सौ निंबाळकर टीचर यांनी आपल्या विद्यार्थ्यांसमोर आजी-आजोबांविषयी थोडक्यात मनोगत व्यक्त केले यानंतर या कार्यक्रमांमध्ये आजींसाठी उखाणे तर आजोबांसाठी प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन केले होते हा कार्यक्रम पाहताच मोठ्या प्रमाणात उपस्थितांकडून प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाच्या संदर्भात प्रिन्सिपल सौ गीतांजली मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून कार्यक्रमाची इतंभुत माहिती देऊन या संस्थेच्या परंपरेप्रमाणे आम्ही सतत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीत आलो आहोत व आपणा सर्वांच्या सहकार्याने भविष्यातही राबवून विद्यार्थी वर्गाला ज्ञानदानाबरोबरच व्यवहारिक ज्ञानाचे व बुद्धी चातुर्याचे त्याचप्रमाणे व्यवहारिक ज्ञानाचे धडे गिरवण्यासाठी आम्ही त्यांना नेहमीच प्रोत्साहित करणार आहोत आणि याच्यासाठी निश्चितपणे आम्हाला पालकांबरोबरच ग्रामस्थांचे ही सहकार्य अपेक्षित आहे. अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाची भाळवणी व भाळवणी परिसरात मोठ्या प्रमाणात कुतूहलाने व कौतुकाने वाहवा केली जात आहे

# साखर कामगाराच्या सुपुत्राची वैद्यकीय क्षेत्रात उत्तुंग भरारी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** तालुक्यातील माणिकनगर येथील सिद्धेश्वर साखर कारखान्यातील हिशेबनीस एम. जी. दौड यांचे सुपुत्र आणि मुंबईतील प्रसिद्ध जे.जे. रुग्णालयातील हृदय शस्त्रक्रिया व संजीवन प्रणाली तज्ज्ञ राजू दौड यांची 'असोसिएशन ऑफ क्लिनिकल परफ्यूजनिस्ट' (ACPMCON 2026) च्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. या नियुक्तीमुळे माणिकनगरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, वैद्यकीय वर्तुळातून त्यांचे अभिनंदन होत आहे. पनवेल येथील विसावा रिसॉर्टमध्ये १० आणि ११ जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत ही निवड जाहीर करण्यात आली. या परिषदेत हृदय शस्त्रक्रिया क्षेत्रातील अत्याधुनिक 'ईसीएमओ' (ECMO) प्रणाली आणि नवीन तांत्रिक संशोधनावर चर्चा करण्यात आली. या परिषदेच्या मुख्य आयोजक टीममध्ये राजू दौड यांनी डॉ. विजय व्यवहारे (एमजीएम रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर)



यांच्या मार्गदर्शनाखाली महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन आगामी पाच वर्षांसाठी त्यांची उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या सोहळ्याला डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जेम्स थॉमस यांची प्रमुख उपस्थिती होती. सिद्धेश्वर हायस्कूलचे माजी विद्यार्थी असलेल्या राजू दौड यांनी एका सामान्य कुटुंबातून येत मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे. त्यांच्या या निवडीबद्दल माणिकनगर ग्रामस्थ आणि मित्रपरिवाराने आनंद व्यक्त केला आहे.

# मंत्रिमंडळात मंत्रिमंडळात एकूण महत्त्वाचे १० निर्णय

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :**

**■ मुंबईत पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ४५ हजार शासकीय निवासस्थाने**

**■ मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिपला मंजुरी**

मुंबई शहर व उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सुमारे ४० ते ४५ हजार शासकीय निवासस्थाने उपलब्ध व्हावीत यादृष्टीने "मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्प राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. हा प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभागाची राज्य पायाभूत सुविधा महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहे. या टाऊनशिप प्रकल्पाद्वारे सुमारे पाच कोटी चौरस फूट क्षेत्राचे विकसन करण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे २० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

या टाऊनशिपसाठी लागणारा ३० टक्के निधी शासन देणार आहे. तर उर्वरित ७० टक्के निधी एमएसआयडीसी शासन हमीद्वारे विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरुपात उभारणार आहे. या प्रकल्पाचा तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी आणि प्रकल्प सुरु करण्याकरिता महामंडळास १०० कोटी रुपयांचा प्राथमिक निधी देण्यास आज मान्यता देण्यात आली.

मुंबईतील वाढत्या लोकसंख्येच्या व सुरक्षेची आवश्यकता लक्षात घेऊन, पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज व अद्ययावत वसाहती व निवासस्थानांची मोठी गरज आहे. यामुळे पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी अधिक तत्पर आणि कार्यक्षमरित्या कर्तव्य बजावू शकणार आहेत.

मुंबई पोलीस दलात ५१ हजार ३०८ इतके मनुष्यबळ आहे. पोलीस दलाकडे उपलब्ध सेवा निवासस्थाने ब्रिटीशकालीन जुन्या व जीर्ण इमारतींमध्ये आहेत. उपलब्ध २२ हजार ९०४ सेवा निवासस्थानांपैकी सुमारे ३ हजार ७७७ निवासस्थाने वापरासाठी अयोग्य आहेत. याशिवाय दरमहा सुमारे चारशे ते पाचशेहून अधिक अधिकारी-कर्मचारी निवासस्थानांसाठी अर्ज करतात. निवासस्थाने उपलब्ध नसल्याने मुंबई पोलीस दलातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना दररोज प्रवास करून कामाच्या ठिकाणी यावे लागते. पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामांचे स्वरूप पाहता, त्यांना कार्यालयाजवळ निवासस्थान असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातून टाऊनशिप प्रकल्पाला मान्यता देण्यात आली.

(जलसंपदा विभाग)

**■ यवतमाळमधील बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४ हजार ७७५ कोटी**

**■ ५८ हजार ७६८ हेक्टरचे सिंचन, अमरावतीमधील धामकचे पुनर्वसन होणार**

यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदी प्रकल्पाच्या कामांसाठी ४ हजार ७७५ कोटींची तरतूद करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

हा प्रकल्प यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यामधील खडकसावंगा गावाजवळील बेंबळा नदीवर बांधण्यात आलेला असून विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत येतो. या प्रकल्पाचा समावेश गोदावरी खोऱ्यामधील वर्धा उपखोऱ्यातील सर्वसाधारण क्षेत्रातील होतो. या प्रकल्पाचा प्रधान मंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत समावेश आहे. त्याबाबत केंद्रस्तरावरून नियमित आढावा घेण्यात येतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेऊन, हा प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

या प्रकल्पामुळे यवतमाळ जिल्ह्यातील नेर, बाभुळगाव, कळंब, राळेगाव व मारेगाव या पाच तालुक्यामधील एकूण ५८,७६८ हेक्टर लागवडीलायक क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. तसेच अमरावती जिल्ह्यातील मौजा धामकच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या गावाचे आदर्श पुनर्वसन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले होते. त्यासाठी ८९ कोटी ३२ लाख रुपये उपलब्ध होणार आहेत.

या प्रकल्पाद्वारे सिंचन, पिण्यासाठी पाणी पुरवठा व मत्स्य व्यवसायासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. तसेच कालवा वितरण पद्धतीने, उपसा सिंचन (सुक्ष्म सिंचन) व बंद नलिका वितरण या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्यातील उजव्या मुख्य कालव्याद्वारे एकूण ४५,४५५ हे. व डेहणी उपसा सिंचन योजनेद्वारे ६,९६८ हे. सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

(कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग)

**■ राज्यातील तरूणांना मिळणार जगभरातील रोजगार संधी**

**■ विविध देशातील रोजगारासंबंधी समन्वयासाठी MAHIMA संस्थेची स्थापना**

जगभरातील विविध देशातील रोजगारासंबंधी समन्वय आणि अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतिशीलता आणि क्षमता संस्था (Maharashtra Agency for Holistic International Mobility & Advancements -MAHIMA) स्थापन आणि कार्यान्वित करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस होते. या संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील तरूणांना विविध देशातील रोजगार उपलब्धता आणि संधी यांची माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे.

भारताच्या लोकसंख्येत (वय १८ ते ४५ वर्षे) कार्यप्रवण गटाचे प्रमाण ६०-६५ टक्के आहे. या गटास रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याचे आव्हान आहे. यामध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागासोबतच इतर विभागांच्या माध्यमातून राज्यातील प्रशिक्षित मनुष्यबळ देश-विदेशातील औद्योगिक संस्थांना पुरविण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे.

महाराष्ट्रात सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रामध्ये मिळून एक हजारहून अधिक शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचे विस्तृत जाळे आहे. कृषि व संलग्न क्षेत्रे, उद्योग, बांधकाम, आरोग्य, आतिथ्य, लॉजिस्टिक्स, बँकिंग, तसेच सेवा इ. क्षेत्रांत लक्षावधी कुशल कामगार तयार होत आहेत. विकसित देशांतील रोजगाराच्या उपलब्ध संधी, देशात मिळणाऱ्या वेतनाच्या तुलनेत मिळणारे जादा वेतन या कारणांमुळे मागील काही वर्षापासून भारतीय युवा वर्गाचा कल आंतरराष्ट्रीय रोजगाराकडे वाढत आहे. यामध्ये महाराष्ट्रातील कामगार आणि विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. केरळ, तेलंगणा व आंध्रप्रदेश या राज्यांनी परदेशातील रोजगारासंबंधी प्रभावी समन्वय व अंमलबजावणीसाठी एकछत्री शिखर संस्था स्थापन केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशिलता आणि क्षमता संस्था स्थापन व कार्यान्वित करण्यास आज मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतिशीलता आणि क्षमता संस्थेबाबत-

संस्थेचे नऊ सदस्यीय संचालक मंडळ. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार मंडळ. MAHIMA च्या माध्यमातून NSDC- International, शासनाचे विविध विभाग, कौशल्य विद्यापीठे, नामांकित शैक्षणिक संस्था, कौशल्य प्रशिक्षण / भाषा प्रशिक्षण संस्था, औद्योगिक संघटना (Industries Associations), नामांकित भरती संस्था (Recruiting Agencies) यांच्या सहाय्याने परदेशातील रोजगार उपलब्धतेसाठीच्या परिसंस्थेचा (Ecosystem) विकास करणार.

दैनंदिन कामकाजासाठी मुंबई येथे मुख्य कार्यालय आणि पाच विभागीय कार्यालये. संस्थेत प्रतिनियुक्ती तसेच बाह्यस्रोताद्वारे मनुष्यबळ घेणार. संस्थेसाठी एकवेळचे भागभांडवल म्हणून २ कोटी रूपये. पहिल्या तीन वर्षांकरिता, मुंबई येथील मुख्य कार्यालय आणि पाच विभागीय कार्यालयांच्या कार्यान्वयनासाठी आणि विविध प्रशिक्षण व समुपदेशन कार्यक्रमांसाठी अंदाजे १३२ कोटी रूपयांचा खर्च अपेक्षित.

G२G अंतर्गत इतर राष्ट्रांतील सरकारच्या मागण्यांनुसार कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी संस्था विदेश मंत्रालय, भारत सरकारचा "भरती संस्था (Recruitment Agency-RA)" चा परवाना घेणार.

MAHIMA संस्थेस अर्थसंकल्पीय प्राप्त निधीतून तसेच विविध स्रोतांतून मिळणाऱ्या [उदा. सामाजिक दायित्व निधी (CSR), स्वेच्छा देणगी (VD), शुल्क आकारणी व इतर स्रोत] उत्पन्नातून निधीचा विनियोग करता येणार.

(नगर विकास विभाग)

**■ अटल सेतूच्या पथकरात आणखी एक वर्ष सवलत**

**■ वाहनधारकांना मोठा दिलासा**

मुंबई व नवी मुंबईला जोडणाऱ्या अटल बिहारी वाजपेयी शिवडी - न्हावाशेवा अटल सेतूच्या वापराकरिता पथकरात पन्नास टक्के सवलत देण्याचा निर्णय कायम ठेवण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. तसेच ईलेक्ट्रीकल मोटार कार, बसेस यांनाही अटल सेतूच्या पथकरातून पूर्ण सूट देण्याबाबतचा मुद्दाही अधिसूचनेत समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे ई- व्हेईकल्स धारक तसेच अन्य वाहनधारकांना दिलासा मिळणार आहे.

राज्य मंत्रिमंडळाने ४ जानेवारी २०२४ रोजीच्या बैठकीत अटल सेतूच्या वापराकरिता पन्नास टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाप्रमाणेच पुढे १ जानेवारी २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत पथकर आकारण्यास मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर इतर वाहनांकरिता एकेरी प्रवासाचा पथकर दर ही निश्चित करण्यात आले. ते पुढीलप्रमाणे आहेत.

अक्र वाहनांचा प्रकार शिवडी

ते गव्हाण शिवडी

ते शिवाजीनगर शिवाजी नगर

ते गव्हाण

१ मोटर, जीप, व्हॅन, हलके मोटार वाहन २५० रु. २०० रू. ५० रू.

२ हलके व्यावसायिक वाहन, हलके मालवाहू वाहन, मिनी बस ४०० ३२० ८०

३ ट्रक अथवा बस ( दोन आसांचे) ८३० ६५५ १७०



४ तीन आसांचे व्यावसायिक वाहन ९०५ ७१५ १८५

५ अवजड बांधकाम यंत्रसामग्री, जमीन खोदाई यंत्रसामग्री, अधिक आसांचे वाहन १३०० १०३० २७०

६ अति अवजड वाहन, सात अथवा त्यापेक्षा अधिक आसांचे वाहन १५०० १२५५ ३२५

(नगर विकास विभाग)

**■ अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या मुख्यालयासाठी पनवेल येथे भूखंड**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मुंबई यांच्या मुख्यालयासाठी पनवेल (पश्चिम) येथील भूखंड विशेष बाब म्हणून १ रुपया प्रति चौ.मी. दराने देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना कंपनी कायदा अधिनियम, १९५६ अंतर्गत २७.११.१९९८ रोजी करण्यात आली आहे. आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करणे, उद्योगासाठी अर्थसहाय्य, उद्योग आणि व्यावसायिक क्षेत्रात मराठा समाजाचा सहभाग वाढविणे ही महामंडळाची उद्दिष्टये आहेत.

सध्या महामंडळाचे मुख्यालय छत्रपती शिवाजी महाराज स्थानकाजवळ भाडे तत्त्वावर आहे. त्यामुळे महामंडळास आणखी प्रभावीरित्या कामकाज करता यावे यासाठी महामंडळाच्या मुख्यालय आणि बहुउद्देशीय इमारतीसाठी पनवेल (पश्चिम) येथील सेक्टर १६ मधील सहा हजार चौरस मीटरचा भूखंड देण्यास मंजुरी देण्यात आली.

(नियोजन विभाग)

**■** अर्थ व सांख्यिकी संचालनालय आता आयुक्तालय,१ हजार ९०१ पदांच्या आकृतीबंधास मान्यता.

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या १ हजार ९०१ पदांच्या आकृतीबंधास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे नाव बदलून अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय असे करण्यासही मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

वित्त विभागाने दिलेल्या सूचनेनुसार अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील कामकाजाचा आणि मंजूर पदांचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार अर्थ व सांख्यिकी संचालनालयाची ९९६ पदे आणि २१२ वाढीव पदे, जिल्हा नियोजन समित्यांची ५७६ पदे, सहआयुक्त ( नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय यांच्या कार्यालयासाठी ६६ पदे, वैधानिक विकास मंडळाची ५१ पदे अशा एकूण १९०१ पदांच्या आकृतीबंधास आज मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर मानव विकास कार्यक्रमाकडील ९५ पदांचे अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या कार्यालयात, तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम कार्यालयाकडील नऊ पदांचे सहआयुक्त (नियोजन) यांच्या कार्यालयात तर नक्षलग्रस्त विशेष कृति आऱाखडा कक्षातील तीन पदांचे जिल्हा नियोजन समितीच्या कार्यालयात समायोजन करण्यासही मान्यता देण्यात आली.

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे नाव बदलून अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय असे करण्यास मान्यता देण्यात आल्याने त्याअनुषंगाने होणाऱ्या पदनामांतही बदल करण्यास मान्यता देण्यात आली.

(नगर विकास विभाग)

**■ मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-२ च्या सुधारित वित्तीय आराखड्यास मान्यता**

मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-२ (MUTP-2) च्या सुधारित ८०८७.११ कोटी रूपयांच्या वित्तीय आराखड्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-२ साठी ५३०० कोटी रूपयांचा प्रकल्प महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालय यांनी मान्य केला होता. हा प्रकल्प दोन विभागात म्हणजेच एमयुटीपी-२-ए आणि एमयुटीपी-२-बी असा विभागण्यात आला होता. एमयुटीपी-२-ए साठी जागतिक बँकेकडून अंशत: आणि महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालय निधी देणार होते. एमयुटीपी-२-बी साठी महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालयालयाने समप्रमाणात निधी उपलब्ध करून देणार होते. आता एमयुटीपी-२ प्रकल्पाच्या सुधारित वित्तीय आराखड्यास वांद्रे (पूर्व) येथील रेल्वेच्या जमिनीचे लवकरात लवकर व्यावसायिक विकास करण्याच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर प्रकल्पातील राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी एमएमआरडीएद्वारे देण्यात आलेल्या ६४६.९५ कोटी रूपयांच्या अतिरिक्त रकमेसही मान्यता देण्यात आली.

उपनगरीय रेल्वे तिकीटावरील अधिभारातून मुंबई रेल्वे विकास कार्पोरेशनकडे १६५२.०५ कोटी रूपये जमा झाले आहेत. ही रक्कम मुंबई रेल्वे विकास कार्पोरेशनने मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-२ मधील विविध प्रकल्पांच्या खर्चासाठी वापरली आहे. त्यामुळे तेवढी रक्कम सदर प्रकल्पातील राज्य शासनाचा हिस्सा म्हणून समायोजित करण्यासही मान्यता देण्यात आली.

वांद्रे (पूर्व) येथील रेल्वेच्या जमिनीच्या व्यावसायिक विकासातून मिळणाऱ्या निधीचे एमयुटीपी-२ प्रकल्पाच्या सुधारित वित्तीय आराखड्यानुसार समायोजन करण्यात येईल. समायोजन करून शिल्लक राहणारा निधी मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३, ३ए आणि ३बी या प्रकल्पांसाठी राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम म्हणून वापरण्यास मान्यता देण्यात आली. त्याकरिता रेल्वे बोर्ड, राज्य शासन, मुंबई रेल्वे विकास कार्पोरेशन आणि रेल्वे भूमी विकास प्राधिकरण यांच्यामध्ये आवश्यकता भासल्यास सामंजस्य करार करण्यासही मान्यता देण्यात आली.

वांद्रे (पूर्व) येथील रेल्वेच्या जमिनीच्या व्यावसायिक विकासातून मिळणाऱ्या निधीच्या एक तृतीयांश राज्य शासनाचा हिस्सा असणार आहे. या निधीचा विनियोग एमयुटीपी प्रकल्पासाठीच केला जाणार आहे. त्यासाठी नगर विकास विभागाच्या अधिनस्त उघडण्यात आलेल्या नागरी परिवहन निधीमध्ये जमा करण्यासही आज मान्यता देण्यात आली. त्यामधून एमयुटीपी प्रकल्पांसाठी आवश्यकतेनुसार निधी वापरण्यासही मान्यता देण्यात आली.

(नगर विकास विभाग)

**■ तिरूपती देवस्थानास पद्मावती देवी मंदिरासाठी**

**■ उलवे येथील भूखंड नाममात्र दराने, शुल्क माफ**

तिरुमला तिरूपती देवस्थानम बोर्डला श्री. पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठी वाटप केलेला भूखंड एक रुपया प्रति चौरस मीटर दराने देण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

तिरुमला तिरूपती देवस्थानमला श्री. पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठी उलवे नोडमधील सेक्टर १२ मधील ३.६ एकरचा भूखंड वाटप करण्याचा निर्णय २९ फेब्रुवारी २०२४ रोजी घेण्यात आला आहे. त्याबाबतचा शासन निर्णयही १२ मार्च २०२४ रोजी जारी करण्यात आला आहे. यासाठी सिडको महामंडळाच्या भूमुल्य आणि भूविनियोग धोरण,२०१८ अनुसार किंमत आकारण्यात यावी असे नमूद करण्यात आले आहे. मात्र आता तिरुमला तिरूपती देवस्थानम् बोर्डने श्री. व्यंकटेश्वरा मंदिर उभारण्यासाठी वाटप करण्यात आलेल्या भूखंडाच्या प्रमाणेच श्री. पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठीही एक रुपया प्रति चौरस मीटर दराने भूखंड वाटप करण्यात यावा आणि इतर संकीर्ण शुल्क सेवाकरासह माफ करावे, अशी विनंती सिडको महामंडळाकडे केली आहे. त्यानुसार सिडको महामंडळाने याबाबतचा ठराव करून प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी पाठवला होता.

त्यावर आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली. श्री. पद्मावती अम्मावरी देवीचे मूळ मंदिर तिरूपतीजवळील तिरूचानूर येथे आहे. हे मंदिर भगवान व्यंकटेश्वराच्या बरोबरीनेच भाविकांचे श्रध्दास्थान आहे. श्री पद्मावती अम्मावरी देवीची अमरावती, विजयनगरम (आंध्र प्रदेश), हैदराबाद, भुवनेश्वर, चेन्नई, बंगळूर, कुरूक्षेत्र, नवी दिल्ली, जम्मू येथे मंदिर आहेत. श्री पद्मावती अम्मावरी देवीचे मंदिर उभारल्यास पर्यटनालाही चालना मिळण्याची शक्यता आहे. मंदिर पर्यटकांचे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरुन संबंधित परिसराला धार्मिक आणि सामाजिक महत्व प्राप्त होण्याची शक्यता आहे. संबंधित देवस्थानामार्फत परिसरात अनेक सामाजिक उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. त्यामुळे तिरुमला तिरूपती देवस्थानम बोर्डला श्री. पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठी वाटप केलेला भूखंड एक रुपया प्रति चौरस मीटर दराने देण्यात यावा, अशा निर्णयास मान्यता देण्यात आली.

(नगर विकास विभाग)

**■ पीएम – ई ड्राईव्हअंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळास**

**■ एक हजार ई- बस सुविधेसाठी निधी वळता करण्याच्या प्रणालीस मान्यता.**

पुणे महानगर क्षेत्रात केंद्र शासनाच्या पीएम-ई ड्राईव्ह योजनेंतर्गत एक हजार ई-बस चालविण्यात येणार आहेत. या सुविधेसाठी संबंधित कंपन्यांना दरमहा द्यावी लागणारी खर्चाची रक्कम (पेमेंन्ट सिक्युरिटी मेकॅनिझम) पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरापालिकांच्या खात्यातून (डायरेक्ट डेबीट मॅन्डेंट - डीडीएम) थेट संबंधित कंपन्यांना वळती करण्याच्या प्रणालीस आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

नागरिकांना महानगर क्षेत्रात उत्कृष्ट परिवहन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाने पीएम ईलेक्ट्रीक ड्राईवह रिव्होल्युशन इन इन्नोव्हेटिव्ह व्हेईकल एनहान्समेंट – पीएम ड्राईव्ह ही योजना हाती घेतली आहे. या योजनेत भारत सरकारच्या अवजड उद्योग मंत्रालयाकडून चार लाखांहून अधिक लोकसंख्येच्या शहरात ईलेक्ट्रीक बसेस उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यात पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (पीएमपीएल) यांनी अवजड उद्योग मंत्रालयाकडे एक हजार बसेसची मागणी केली आहे. यात नऊ मीटरच्या २०० आणि १२ मीटरच्या ८०० बसेस असतील. या बसेस महानगर क्षेत्रात चालविण्याकरिता ज्या कंपनीला नियुक्त केले जाईल. त्या कंपनीला बस चालविण्याकरिता देखभाल, दुरूस्ती व चालन यापोटी दरमहा रक्कम द्यावी लागणार आहे. ही रक्कम केंद्राच्या मार्गदर्शक सुचनेनुसार व करारानुसार एस्क्रो अकाऊंटच्या माध्यमातून दिली जाते. त्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेस राज्य शासनाकडून राज्य शासनाकडून डायरेक्ट डेबीट मँन्डेट देणे आवश्यक ठरते. त्यानुसार या बैठकीत अशा प्रणालीस मान्यता देण्यात आली. यापूर्वी राज्यातील २३ शहरातील ई- बसेसकरिता अशा प्रणालीस मान्यता दिली गेली आहे.

पीएमपीएलला पीएम-ई ड्राईव्ह करता निधीची कमतरता भासल्यास, राज्याच्या एकत्रित निधीतून रक्कम या देयकापोटी वळती झाल्यास, या दोन्ही महापालिकांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या राज्य वस्तू व सेवा कराच्या अनुदानातून कपात करण्यात येईल. तसेच या योजनेच्या अंमलबजावणीकरिता पुणे महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती तर नियमित आढावा संनियत्रणासाठी पीएमपीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती गठीत करण्यात यावी अशा अटीही घालण्यात आल्या आहेत.

(महसूल विभाग)

**■ फळे, भाजीपाला निर्यातीकरिता बापगांव येथे मल्टी मॉडेल हब उभारणार**

**■ दरवर्षी एक लाख टन हाताळणी क्षमता, जागतिक बँकेच्या सहकार्याने प्रकल्प**

भाजीपाला निर्यातीकरिता शेतकऱ्यांसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगांव (ता. भिंवडी ) येथे सर्वोपयोगी – मल्टी मॉडेल हब व टर्मिनल मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य कृषि पणन महामंडळाला ७ हेक्टर ९६.८० आर जमीन उपलब्ध करून देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या जागेवर जागतिक बँक व महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) या प्रकल्पाच्या माध्यमातून हब, टर्मिनल उभारण्यात येणार आहे. ज्यासाठी ९८ कोटी ६६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला गेला आहे. ही जमीन राज्य कृषि पणन महामंडळाला वर्ग – २ धारणाधिकारांने विनामूल्य दिली जाणार असून, या ठिकाणी व्हेपर हिट ट्रीटमेंट, प्लॅंट विकीरण, पॅक हाऊस सुविधा तसेच फळे- भाजीपाला साठवणुकीकरिता सुविधांची उभारणी केली जाणार आहे. याठिकाणी आंबा, मसाले, पशुखाद्य यांच्यावर विकीरण प्रक्रियेद्वारी निर्जलीकरण करण्यात येणार आहे.

या प्रकल्पामुळे दरवर्षी एक लाख टन शेतमालाची हाताळणी करणे शक्य होणार आहे. ठाणे जिल्ह्यासह, राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी एक मोठी सुविधा निर्माण होणार आहे. यातून शेतमाल निर्यातीस प्रोत्साहन मिळणार आहे. शेतमालाची गुणवत्ता सुधारणे, प्रक्रिया करणेची सुलभ होणार आहे. याठिकाणी व्यापारी व निर्यातदार यांना एकाच छताखाली आणले जाणार आहे. यातून निर्यात आणि लॉजिस्टिक (logistics) सेवांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. निर्यातवाढीमुळे परकीय चलन मिळणार आहे. जगभरातील बाजारपेठा व प्रकल्पांचा अभ्यास करुन एकात्मिक असा प्रकल्प उभारणेत येणार असल्यामुळे शेतमालाचे काढणीपश्चात नुकसान कमी होण्यास व मालाचा दर्जा सुधारण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती होणार असून लगतच्या परिसरातील व्यवसायांना देखील चालना मिळणार आहे.

# परधान समाजातील " समाज रत्न " मा मधुसूदन कोवे गुरुजी यांनाच आम्ही आमचे आधारस्तंभ मानतोय - राहुल मेश्राम

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादक :** सामाजिक कार्य असो किंवा समाजात घडत असलेले वेगवेगळ्या प्रकारचे प्रसंग असो या कार्यक्रमात मा मधुसूदन कोवे गुरुजी चे प्रत्यक्ष कर्तुत्व आमच्या साठी मोठी प्रेरणा आहे. म्हणून " गुरुजी " आमच्या साठी " समाज रत्न " आहे .* *श्रीरामपूर ( कोदुर्ली ) येथे आमच्या कुटुंबातील तरुण युवक स्व. विनोद वामनराव चांदेकर यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्याने चांदेकर कुटुंबातील लोकांवर मोठं संकट निर्माण झाले आहे* *आम्ही सांत्वनासाठी गेलो असता कुटुंबातील लोकांना होतं असलेल्या वेदना आम्ही प्रत्यक्ष अनुभवतं होतो पण आम्ही काय करणार काही कळत नव्हतं आमच्या समाजात अनेक राजकीय पुढारी होवून गेले आणि आज ही " मस्त मवाल " मजा मारत आहे. कोण मरतेय कोण कोणत्या संकटात जगतोय याचं सोयरसुतक ह्या राजकीय पुढाऱ्यांना नाही.समाज यांना माफ करणार नाही हे मात्र सत्य आहे हे मी माझ्या नजरेने श्रीरामपूर ( कोदुर्ली ) येथे बघितले आहे* *अचानक आम्ही सांत्वनासाठी गेलो असता मा. मधुसूदन कोवे गुरुजी, अध्यक्ष ग्राम स्वराज्य महामंच यांनी मला प्रथम दर्शनी जवळ बोलावून समाजातील जो सोपस्कार होता तो साडी चोळी, आणि



लहान लहान मुलांची डोकी झाकून शेला दुप्पटा देत हा आधार कुटुंबासाठी मोठा दिलासा होता हा सोपस्कार माझ्या हातून घडलवला असं कार्य आम्ही कधीच विसरू शकत नाही असे मतं राहुल मेश्राम युवा नेतृत्व, राळेगाव भुमी पुत्र यांनी व्यक्त केले* *या सांत्वनासाठी समाजातील सक्षम समाज बांधव चांदेकर कुटुंबातील लोकांना आधार देण्यासाठी खंबीर पणे उभी राहिली आहे हा पुढाकार मा मधुसूदन कोवे गुरुजी यांचा आहे म्हणून ते आमच्या साठी " परधान समाज रत्न " ते समाजातील आमचे आधारस्तंभ आहे या सोपस्कार कार्यक्रमासाठी सहभागी देवेंद्र आत्राम, मोहण आत्राम यांनी जेवणाची जबाबदारी पार पाडली मधुसूदन कोवे गुरुजी अध्यक्ष ग्राम स्वराज्य महामंच राहुल मेश्राम भुमी पुत्र राळेगाव मारोतराव आडे ग्राम पंचायत सदस्य श्रीरामपूर अशोकराव मंगाम सुरेश गेडाम दिलीप मेश्राम वामनराव राऊत प्रल्हाद काळे रामकृष्ण सलामे भगवान कोवे विजय आडे बहुसंख्येने समाज बांधव उपस्थित होते*

# भा.मा.कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत निबंध व चित्रकला स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/ रणजितसिंह ठाकुर :** रिसोड तालुक्यातील एकमेव नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणारी भारत माध्यमिक कन्या शाळा व महाविद्यालयात दिनांक 17 जानेवारी रोजी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेच्या हजारो विद्यार्थिनींनी भाग घेत शासनांतर्गत राबवल्या जाणाऱ्या देशव्यापी मोहीम रस्ता सुरक्षा अभियान या मध्ये वाहतूक पोलीस, परिवहन विभाग, आरोग्य विभाग,शिक्षण विभाग या अंतर्गत 1 जानेवारी ते 31 जानेवारी पर्यंत संपूर्ण महिनाभर राबवला जाणारा "रस्ता सुरक्षा अभियान" या मोहिमेअंतर्गत भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ



महाविद्यालयामध्ये आदरणीय प्राचार्य मंजुषा सु.देशमुख मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख मार्गदर्शक सन्माननीय पाहुणे विनोदजी धनवंत RTO वाशिम, पर्यवेक्षक आदरणीय सुनील डहाळके सर या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत रस्ता सुरक्षा अभियान राबवत असताना शालेय विद्यार्थिनी करिता चित्रकला व निबंध स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये हजारो विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. या सप्ताह निमित्त मार्गदर्शन करताना पर्यवेक्षक आदरणीय सुनील डहाळके सर यांनी मार्गदर्शन करताना सिग्नलला मान देणे, लेनची शिस्त पाळणे, वेग मर्यादा सांभाळणे, मोबाईलचा वापर टाळणे अशा विविध विषयावर सखोल असे मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक आदरणीय सन्माननीय विनोदजी धनवंत (आरटीओ वाशिम) यांनी या रस्ते सुरक्षा अभिनयासंदर्भात मार्गदर्शन करताना आज अपघाताचे प्रमाण वाढले असून घरोघरी वाहने झाली आहेत. त्यामध्ये हेल्मेट आणि शीट बेल्टचा वापर वापर न करणे, वेगावर नियंत्रण ठेवणे, वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलणे, चित्त स्थिर आणि एकाग्र नसणे यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होतात. त्यासाठी उपाय म्हणून प्रत्येकाने वाहन चालवण्याच्या बाबतीत सतर्क राहणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे असे अमूल्य मार्गदर्शन आपल्या विचारातून व्यक्त केले . शेवटी महाविद्यालयाच्या प्राचार्या मंजुषा सु.देशमुख मॅडम यांनी अध्यक्षीय समारोप करत असताना सुरक्षेचे उपाय म्हणून कागदपत्रे सोबत ठेवावी, गाडीची वेळोवेळी काळजी निगा घेणे गरजेचे, जागरूक सतर्क राहणे, पुरेशी झोप आवश्यक, ओव्हरलोडींग टाळणे ओव्हरटेक करणे टाळावेत अशा अनेक गोष्टींचीं काळजी घेतली तर अपघात टाळतील. त्याचबरोबर झेब्रा क्रॉसिंग डाव्या बाजूने चला समोर पाहून चला अशा विद्यार्थ्यांना सूचना देत आपल्या शब्दाला पूर्णविराम दिला.

या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा शाम चोमवालं सर व आभार प्रदर्शन प्रा. गुलाब श्रीपत साबळे यांनीज केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.पांडुरंग मोरे क्रीडा शिक्षक आनंद झडपे सर, बोराळकर सर,शेटे मॅडम सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले.

# कॅप्टन कूल' धोनीच्या ब्रँडचा उरण मध्ये सामाजिक षटकार 'इंडिगो पेंट्स' च्या वतीने काळाधोंडा शाळेची मोफत रंगरंगोटी

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** भारतीय क्रिकेटचा महानायक महेंद्रसिंग धोनी ज्या कंपनीचा ब्रँड अँबेसिडर आहे त्या इंडिगो पेंट्स कंपनीने आपल्या सामाजिक बांधिलकीतून उरण मधील शिक्षणाला नवा रंग दिला आहे. इंडिगो पेंट च्या वतीने रविवार दिनांक १८जानेवारी रोजी रायगड जिल्हा परिषद शाळा काळाधोंडा येथे मोफत रंगरंगोटीचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. विशेष म्हणजे मोहिमेत सहभागी झालेल्या पेंटर बांधवांनी एक दिवसाची मजुरी न घेता श्रमदान करून ही शाळा चकाचक केली.

इंडिगो कंपनी ही दर्जेदार रंगासाठी ओळखली जातेच पण महेंद्रसिंग धोनी या कंपनीचा



चेहरा असल्याने या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. धोनीच्या व्यक्तिमत्वाप्रमाणे' शांत राहून मोठे काम करणे' हा विचार डोळ्यासमोर ठेवून कंपनी दरवर्षी 'गाव तिथे शाळा, या मोहिमेंतर्गत शाळांची निवड करते त्याचप्रमाणे मंदिरे, सामाजिक संस्था यांची निवड करून हा समाजाभिमुख उपक्रम राबवला जातो. काळाधोंडा येथील शाळेची निवड करून मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक व ग्रामस्थांच्या योगदानाने एक दिवसात हे काम पूर्ण करण्यात आले. स्थानिक पेंटर आणि कॉन्ट्रॅक्टर्स या कामगारांनी एका दिवसाची मजुरी न घेता आपल्या कौशल्याचा वापर शाळेच्या भिंती रंगवण्यासाठी केला. त्यांना इंडिगो पेंट्स कडून रंग पुरवण्यात आला. अवघ्या काही तासातच जिल्हा परिषद शाळेचे रूप पालटले. हा दिवस केवळ कामाचा नव्हता तर तो आनंदाचाही ठरला .श्रमदान करणाऱ्या पेंटर बांधवांच्या कुटुंबियांसाठी कंपनीने विशेष भोजन व गंमतीशीर खेळ व बक्षिसांचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी उपनगराध्यक्ष रवी भोईर , शालेय समितीचे अध्यक्ष शंकर भोईर, जयेश भोईर, जितेंद्र भोईर ,नवनीत भोईर, कुंदन भोईर, मनीष पाटील, दीपक पाटील ,नरेश भोईर, महादेव बंडा ,विलास पाटील, गणेश पाटील, रमण कासकर व ग्रामस्थ उपस्थित होते. त्याचप्रमाणे काळा धोंडा शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप म्हात्रे व सहकारी शिक्षकवृंद, इंडिगो पेंटस् कंपनीचे सुजीत कुमार,(ब्रँच मॅनेजर,)ओमकार सुध्रीक(एस एस ओ), योगेश गुर्जर(उरण डिलर) यांचे योगदान महत्त्वाचे आहे. इंडिगो पेंन्टस चा हा उपक्रम ग्रामीण भागातील शाळांच्या सक्षमी करण्यासाठी एक मैलाचा दगड ठरणार आहे.

# चुंबळी गावात राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावत्रीबाई फुले, फातिमा शेख, स्वामी विवेकानंद याची संयुक्त जयंती उत्साहात साजरी...

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** दिनांक-१५/०१/२०२६ रोजी संध्याकाळी चुंबळी गावात राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले, फातिमा शेख व स्वामी विवेकानंद यांची संयुक्त जयंती महीला भगिनी व पुरूष बांधव यांच्या उपस्थित मोठ्या उत्साह पार पडली. हा कार्यक्रम अध्यक्ष मंडळ गावचे सरपंच डॉ.रेश्माताई पवळ, उपसरपंच गीतांजली ताई नागरगोजे, इंदुबाई सिरसट, याच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. प्रथम कार्यक्रामाचे प्रमुख पाहुणे व अध्यक्ष मंडळातील महीला यांनी वरील महामानवाच्या प्रतिमेस पुष्पहार वाहुन पुजन करण्यात आले. व नंतर सामुहीक अभिवादन करण्यात



आले. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राध्यापिका सुशीलाताई मोराळे, भाई विष्णुपंत घोलप, जेष्ठ नेते दलित मित्र एकबाल पेंटर, साजेद भाई, पत्रकार विजय जाधव, या प्रमुख अतिथीनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने १३/०१/२०२६ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील विद्यालय, चुंबळी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चुंबळी या शाळेतील व विद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या वरील महामानवावर उत्कृष्ट भाषण स्पर्धा घेऊन त्यांना सरसकट सर्व स्पर्धकांना १५/०१/२०२६ रोजी संध्याकाळी संयुक्त जयंतीच्या निमित्ताने बक्षीस वितरणाचा कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमात गावातील महीला व पुरूष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या जमलेल्या मोठ्या जनसमुदाय प्राध्यापिका सुशीलाताई मोराळे यांनी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मॉ साहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, फातिमा शेख व स्वामी विवेकानंद या महामानवाच्या विचारांची शिदोरी त्यांनी त्याना दिली. अध्यक्ष समारोप सरपंच डॉ.रेश्माताई पवळ यांनी केले. या प्रसंगी शेवटी आयुष्य भर भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीत काम केलेल कॉ.चाऊस भाई पठाण यांना सपत्नीक जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला.

या संपुर्ण कार्यक्रमाचे सुत्रसचलन व आभार प्रदर्शन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे व महाराष्ट्र राज्य किसान सभेचे उपाध्यक्ष कॉ.महादेव नागरगोजे यांनी केले जय भिम, लाल सलाम...

# श्रीहरीनगर, मानेवाडा येथील ज्येष्ठ नागरिकांची दर्शनीय माहूरगड सहलीने घेतला आनंद

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग :** श्रीहरीनगर ज्येष्ठ नागरिक मंडळातर्फे दोन दिवसीय दर्शनीय सहलीचे आयोजन करण्यात आले होते. १७ जानेवारी ला सर्वप्रथम भक्तमंडळींनी खडकी येथे संकट मोचन हनुमानजीचे दर्शन घेतले. त्यानंतर सर्वांनी नाश्ता करून माहूरगडसाठी प्रस्थान केले. कळंबच्या समोर मानापुर येथील गार्डनमध्ये सर्वांनी वनभोजनाचा आस्वाद घेतला. गार्डनमधील मनमोहक, आल्हाददायक वातावरणाचा आनंद घेतला आणि सर्वांनी "वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे " हे गाणे गाऊन निसर्गाचे महत्व पटवून दिले. आपल्याला निसर्गाने भरभरून दिले, आपणही निसर्गाचे संवर्धन करू या. ही आकांक्षा मनी बाळगून बस माहूरगडच्या प्रवासासाठी निघाली.

माहूरगडला पोहचल्यावर भक्तमंडळींनी सर्वप्रथम आई रेणुकामातेचे, परशुरामाचे, मॉ. अनुसया मातेचे व श्री.दत्तप्रभूचे दर्शन घेतले. माहूरगडावरुन माहूरवस्तीकडे परतीचा प्रवास करतांना डोंगरदऱ्यातील डूलणारी झाडे, निसर्गरम्य परिसर व रात्रीला गावातील दिव्यांचे लख लखणाऱ्या प्रकाशाचे विलोभनीय दृश्य पाहून सर्व भक्तमंडळीचे मन आनंदाने भरून आले. त्यानंतर सायंकाळी कुलस्वामिनी हॉटेलमध्ये भक्तमंडळीनी रुचकर, स्वादिष्ट भोजनाचा आनंद घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी रविवारला माहूर येथे भक्तमंडळींनी नाश्ता केला व बसचे कळंबसाठी प्रस्थान झाले. कळंब येथे श्री.चिंतामणीचे दर्शन घेतले. उत्तम अशा प्रकारच्या भोजनाची व्यवस्था प्रसादालयात करण्यात आली होती. सर्वांनी प्रसादालयात भोजन केले या सहलीसाठी ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान नागपूर यांनी विनामूल्य बस देऊन सहकार्य केले. प्रतिष्ठानतर्फे बस उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. राजीव मिश्रा (सचिव) यांच्या सहकार्याबाबत आम्ही सर्व भक्तमंडळीं त्यांचे आभारी आहोत. सहल यशस्वी करण्यासाठी श्रीहरी नगर ज्येष्ठ नागरिक मंडळातील पदाधिकारी सुरेशराव उरकुडे, विठ्ठलरावजी घोडे, डॉ. अशोक मंदे, नामदेवराव खाटके, प्रवीण सुरकर, हरीश लाकडे, नरहरी महाजन, अशोक कोरडे, साहेबराव सरोदे, अशोक माहुरे, वडीखाये, सौ. वराडकर, सौ.मंगला उरकुडे, सौ.पुष्पा सुरकर, सौ. रेखा लाकडे, सौ. कोल्हे व सर्व भक्तमंडळींचे सहकार्य लाभले.

# रोहा येथील शेतकरी नितीन पाटील यांचा स्ट्रॉबेरी लागवडीतून कमाल यशोगाथा; लाखोंचे उत्पन्न आणि शेतकऱ्यांसाठी प्रेरणास्थान

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे / अलिबाग/ रेवदंडा प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील फुगारेवाडी गावातील शेतकरी नितीन पाटील यांनी महाबळेश्वरच्या विंटर डॉन जातीच्या स्ट्रॉबेरीची यशस्वी लागवड करून शेती क्षेत्रात नवे वळण दिले आहे. सात एकर बागेत सेंद्रिय पद्धतीने केलेल्या या लागवडीतून त्यांनी लाखो रुपयांचे उत्पन्न कमावले असून, स्थानिक शेतकऱ्यांसाठी हे यश आदर्श उदाहरण ठरले आहे. ठिबक आणि स्प्रिंकल सिंचन यंत्रणेच्या मदतीने उष्णकटिबंधीय हवामानातही स्ट्रॉबेरीची सातत्यपूर्ण लागवड शक्य असल्याचे नितीन पाटील यांनी सिद्ध केले आहे.नितीन पाटील यांच्या सात एकर बागेत केवळ स्ट्रॉबेरीच नव्हे, तर फुलझाडे, फळझाडे, भाज्या आणि औषधी वनस्पतींचीही सेंद्रिय लागवड करण्यात आली आहे. कोणत्याही रासायनिक खतांचा वापर न करता





नैसर्गिक खतांचा अवलंब केल्याने या स्ट्रॉबेरी फळांचा चवदारपणा आणि बाजारातील मागणी वाढली आहे. गेल्या दोन महिन्यांत स्थानिक बाजारात ६५ ते ८५ हजार रुपयांची विक्री झाली असून, नोव्हेंबर ते डिसेंबर दरम्यान सरासरी चार पीके घेता येतात. यामुळे वर्षभरात लाखो रुपयांचे उत्पन्न सहज शक्य होते, असं नितीन पाटील यांनी सांगितले. भात शेतीसोबत स्ट्रॉबेरीचा संगम.नितीन पाटील यांनी स्ट्रॉबेरी लागवडीसह पारंपरिक भात शेतीही कायम ठेवली आहे. एकाच शेतीवर अवलंबून न राहता विविध पिकांचा अवलंब केल्याने त्यांचे उत्पन्न दुप्पट झाले आहे. "महाबळेश्वरला जायची गरज नाही. रोहा यासारख्या भागातही योग्य काळजी आणि आधुनिक तंत्रज्ञानाने स्ट्रॉबेरी यशस्वीपणे उगवू शकते," असं आवाहन त्यांनी शेतकरी मित्रांना केले आहे. गेल्या दोन वर्षांत महाबळेश्वर आणि वाई येथून घेतलेल्या विंटर डॉन रोपांनी उत्तम उत्पादन दिले असून, यंदाही चांगल्या अपेक्षा आहेत. कृषी अधिकाऱ्यांचे कौतुक आणि स्थानिक शेतकऱ्यांना प्रेरणा

रोहा कृषी विभागाचे अधिकारी नितीन पाटील यांच्या बागेला भेट देत उत्पादनाचे अवलोकन करून त्यांचे अभिनंदन केले. या यशस्वी प्रयोगामुळे फुगारेवाडी आणि परिसरातील अनेक शेतकऱ्यांमध्ये उत्साह संचारला आहे. गेल्या काही दिवसांत २० हून अधिक शेतकऱ्यांनी नितीन पाटील यांच्या बागेला भेट देऊन लागवडीची माहिती घेतली आहे स्ट्रॉबेरी लागवड सुरू केली आहे. सेंद्रिय शेतीची नवसुविधा सेंद्रिय स्ट्रॉबेरीमुळे बाजारात मागणी वाढली आहे. नितीन पाटील यांनी सांगितले, "उच्च उत्पन्न देणाऱ्या पिकांकडे लक्ष दिल्यास शेती व्यवसाय सुफळ होईल आणि रोहा तालुक्याला नवीन ओळख मिळेल." या प्रयोगाने स्थानिक शेतकरी आधुनिक आणि स्मार्ट शेतीकडे वळू लागले आहेत. अशा पद्धतीने शेती केल्यास आर्थिक सक्षमता वाढते आणि चविष्ट, नैसर्गिक उत्पादने स्थानिक बाजारात उपलब्ध होतात. रोहा आणि रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी हा प्रयोग खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरत आहे.

# विधवा महिलेच्या किराणा दुकानाला अचानक आग लागल्याने सर्व सामान जळून खाक

**दैनिक युवक आधार**

**दिलीप भालेराव किनवट प्रतिनिधी :** किनवट तालुक्यातील करंजी (ई) या गावातील एका किराणा दुकानाला अचानक आग लागल्याची घटना दि 17 जानेवारी 2026 रोजी रात्री दहा वाजता घडली. या आगीत दुकानातील संपूर्ण साहित्य व माल जळून खाक झाले दुकानदार लक्ष्मीबाई रोहिदास शिंदे यांचे अंदाजे पन्नास हजार




ते साठ हजाराचे नुकसान झाले आहे लक्ष्मीबाई रोहिदास शिंदे हे आपल्या उपजिविकेसाठी किराणा दुकान चालवीत होते पण अचानक आग लागल्यामुळे दुकान पुर्णतः जळून गेल्याने त्यांचा उदरनिर्वाहचा एकमेव सौर्स उध्वस्त झाला आहे आग कशामुळे लागली ह्यांच्याबद्दल स्पष्ट कारण अद्याप समोर आले नाही घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझविण्याचा प्रयत्न केला परंतू तोपर्यंत दुकानातील सर्व साहित्य जळून खाक झाले होते या घटनेमुळे विधवा लक्ष्मीबाई रोहिदास शिंदे यांच्यावर आर्थिक संकट कोसळले यासाठी प्रशासनाने आर्थिक मदत करावी अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे .

# महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभे तर्फे चंद्रशेखर बावनकुळे यांचे अभिनंदन

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग :** महाराष्ट्रात नुकत्याच संपन्न झालेल्या नगरपालिका,नगरपंचायत व महानगरपालिका निवडणुकीत राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात आणि राज्याचे महसूलमंत्री, भाजपाचे ज्येष्ठ नेते समाजभूषण मा. चंद्रशेखरजी बावनकुळे यांचे कुशल संघटन, कठोर परिश्रम, आणि लोकाभिमुख शासन व प्रशासन यामुळे या निवडणुकीत भाजपाला राज्यात भरघोस



यश प्राप्त झाले असून निकालावरून भाजपा क्रमांक एक चा पक्ष आलेला आहे. यात यांचा मोलाचा वाटा असून, संपूर्ण समाजाला त्यांचा अभिमान आहे. त्यामुळे प्रांतिकचे, राज्य अध्यक्ष रामदासजी तडस यांचे नेतृत्वात, राज्य कार्याध्यक्ष गजानन शेलार, राज्य महासचिव डॉ.भूषण कर्डिले, राज्यकोषाध्यक्ष बळवंतराव मोरघडे यांनी चंद्रशेखर बावनकुळे याचे कोराडी, जिल्हा नागपूर येथील निवासस्थानी जाऊन पुष्पगुच्छ व पेढा देऊन या यशाबद्दल अभिनंदन केले. व त्यांचे पुढील कार्यास सदिच्छा दिल्यात. यांप्रसंगी युवा आघाडी नागपूर विभाचे अध्यक्ष प्रवीण बावनकुळे सोबत होते. नागपूर महानगर पालिकेत तेली समाजाचे भाजपा पक्षाचे १९, शिवसेना (उबाठा) चे २ आणि काँग्रेस तर्फे १ उमेदवार असे एकूण २२ उमेदवार विजयी झाले आहेत.

## रजनीकांत बोरेले,नीता मडावी (बोरेले) यांच्या हस्ते नागदेवता मंदिरात शिव रात्री व प्रदोषच्या पावन पर्वावर सर्व पदधिकारी व सेवाधारी यांचा वस्त्र,साडी,शेला देवून सत्कार - संतोष राऊत

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/पांढरकवडा** : यवतमाळ जिल्ह्यातील मौजा जरंग येथील प्राचीन नागदेवता तीर्थ क्षेत्र मंदिर येथे दिनांक१६/१/२०२६ रोजी मासिक शिव रात्री आणि प्रदोष च्या निमित्याने पांढरकवडा येथील प्रसिध्द व्हिसल ब्लोअर आणि सामाजिक कार्यकर्ते, रजनीकांत डालूरामजी बोरेले, त्यांची पत्नी नीता ताई मडावी (बोरेले),सुपुत्र सर्वम बोरेले या सर्वानी नाग देवता आणि शिव - पारबती व श्री गणेश यांचे विधिवत वैदिक मंत्रोउच्चार करुण पूजा अर्चना केली

या शिवाय मासिक शिव रात्री असल्याने शिव - पारबतीचे मोली ने गट बंधन शिव भक्त रजनीकांत बोरेले यांनी केला आहे .महत्वाची बाब म्हणजे हा नाग देवता तीर्थ क्षेत्र मंदिर जरंग तोच स्थान आहे जिथे शिव महा पुराण कथा रजनीकांत बोरेले यांच्या पुढाकराने झाली होती. आणि आस्था चैनलच्या माध्यमातून जगात प्रसारण झाला होता तेवा मौजा जरंग येथील नागदेवता मंदिर सर्व दूर चर्चेत आला होता हे विशेष

याच मंदीरचे पदधिकारी आणि सेवाधारी यांचे दिनांक १६/१/२०२६ रोजी नागदेवता मंदिर संस्थान चे अध्यक्ष विठ्ठल राऊत, उपाध्यक्ष संजय जाधव, सचिव,वासुदेव राठोड, तुकाराम गमे,





विजय धांदे, सुनील पोले भास्कर खुरसाने ,मंगेश नागरकर, अरुण नक्षणे, संतोष राऊत ,बंडू जाधव ,अंकुश तोडसाम, रवी चौधरी, नामदेव मोहुर्ले या सर्वांचे रजनीकांत बोरेले यांनी वस्त्र,शेला आणि घरच्यां साठी साडी देवून सत्कार केला आहे. हे सर्व सत्कार झालेले मान्यवर मंदिराची सेवा अत्यंत श्रद्धा पूर्वक करतात. त्या भागातील नागरिक,महिला व तरुण युवक खुप चाहतात. हे विशेष सत्कारच्या वेळी मुकेश राठोड सुजीत राठोड यांच्या सह अनेक मंडळी प्रामुख्याने उपस्थित होते

# वडकीत स्मॉल वंडर्स शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

## स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांना घडवण्याची संधी - कांचनताई मुरके

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/ वडकी** : शाळेतील स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाकडे केवळ मनोरंजन म्हणून न पहाता मुलांच्या कलागुणांना समोर आणून त्यांना घडवण्याची एक संधी' म्हणून बघायला हवे, असे वक्तव्य कांचनताई मुरके यांनी स्मॉल वंडर्स च्या वतीने आयोजित स्नेहसंमेलन कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना सांगितले. दरवर्षी विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या कलागुणांना विकसित करण्यासाठी व त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत असतात , नृत्य, अभिनय परिसंवाद ,भाषणे, संवाद सुंदर हस्ताक्षर ,चित्रकला अशा विविध स्पर्धांमधून त्यांनी विद्यार्थ्यांच्या आत दडलेल्या कलेला प्रोत्साहन दिले आहे. शिक्षणासह प्रत्येक विद्यार्थ्यांमधे केलेल्या कलेला बाहेर आणून त्यांना मार्गदर्शन करत त्याचा सराव घेणे हे फार



महत्त्वाचे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.वडकी राळेगाव येथील स्मॉल वंडर्स हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, वडकी (जि. यवतमाळ) येथील वार्षिक स्नेहसंमेलनात निमंत्रित प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

स्नेहसंमेलनामाचे उद्घाटन कार्यक्रमाच्या उद्घाटिका. शकुंतला डी. सागर (सचिव, अश्वरोही ग्रामीण व बहुउद्देशीय संस्था, नागपूर) यांच्या हस्ते कार्यक्रमाचे गंभीररावजी भोयर (सदस्य, अश्वरोही ग्रामीण व बहुउद्देशीय संस्था, नागपूर) यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, एकांकिका व विविध सांस्कृतिक सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत त्यांच्या आत्मविश्वासात भर घालणारा हा कार्यक्रम ठरला. समाजसेविका विद्यताई लाड, यांनी कार्यक्रमात उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले तसेच डॉ. प्रेमदास यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करून शिक्षणासोबत संस्कार व कला विकासाचे महत्त्व विशद केले.दोन दिवस चालणाऱ्या या स्नेहसंमेलनात बक्षीस वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून लेखिका व पत्रकार कांचन मुरके मॅडम (अमरावती ) यांनी आपली उपस्थिती लावून विद्यार्थ्यांसह पालकांना मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी स्मॉल वंडर्स हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेजचे माजी विद्यार्थी डॉ प्रणित अरुण जीवने( चंद्रपूर) यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले पाहुण्यांच्या हस्ते शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र आणि पदक देऊन सन्मानीत करण्यात आला. कार्यक्रमात पालक, ग्रामस्थ व माजी विद्यार्थी तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने करण्यात आली. 100 महिला पालकांना हळदी कुंकू चा कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकवर्ग अहमद शेख, शंकर मालखेडे, विजय फुलकर, नितीन गवळी, प्रेमकुमार इंगोले, वैभव करडे, अक्षय वानखेडे, शनो शेख, नीता फुटाणे, रुबीना शेख, कल्पना दाते, सीमा झोटिंग, कोयल मुरके, रंजना आवारी व विद्यार्थी आणि पालक वर्गाने विशेष योगदान दिले.स्नेहसंमेलन संयोजन व नियोजन प्राचार्या डॉ. मंजुषा डी.सागर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडले.

## वरूड येथे इंद्रराज महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व इंद्रराज कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , सिल्लोड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप सोहळा वरूड येथे दि. १६ जानेवारी २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. जी. जी. राजपूत होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. दीपक गवई यांची उपस्थिती होती. तसेच व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. लांब, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. सी. एम. काळे, वरूडचे सरपंच श्री. दीपक कळम, उपसरपंच श्री.



गुलाब मिरगे, स्टाफ सेक्रेटरी डॉ. जे. एस. अंभोरे व आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ. एस. एस. चौथाइवाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

दिनांक १० ते १६ जानेवारी या कालावधीत राबवण्यात आलेल्या या शिबिरात स्वयंसेवकांनी विविध श्रमदानाच्या माध्यमातून गावात स्वच्छता, जलसंधारण आणि सामाजिक प्रबोधनाची कामे केली. समारोप प्रसंगी शिबिराचे सात दिवसांचे अहवाल वाचन कार्यक्रमाधिकारी डॉ. के. आर. नगरे यांनी केले. अनेक विद्यार्थ्यांनी शिबिरातील आपल्या अनुभवांचे मनोगत व्यक्त करताना श्रमसंस्काराचे महत्त्व विशद केले.

या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार उत्तमसिंह पवार, सचिव अशोक देवरे व रा.से.यो. समन्वयक डॉ. सोमीनाथ खाडे यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. एम. बिरादार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. विनोद शेळके यांनी मानले.

शिबीर यशस्वी करण्यासाठी रा.से. यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. प्रीतम मुळे, प्रा. डॉ. जे. जे. पाटील, प्रा. डॉ. सविता म्हस्के यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामपंचायत सदस्य व वरूड येथील प्रतिष्ठित नागरिकांनी मोलाचे सहकार्य केले.

## न्यू इंग्लिश हायस्कूलचे दोन संघ विभागस्तरीय टेनिस व्हॉलिबॉल स्पर्धेत यशस्वी

### दोन संघ एकाच वेळी राज्यस्तरीय स्पर्धेत पात्र झाल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी राळेगाव** : शालेय क्रीडा विभागस्तरीय १४ व १७ वर्ष वयोगटातील टेनिस हॉलिबॉल मैदानी स्पर्धा स्कूल ऑफ स्कोलर्स, हिंगणा रोड, अकोला येथे १२ जानेवारी रोजी पार पडली. यामध्ये यवतमाळ जिल्ह्यात मैदानी स्पर्धेत आपला दबदबा असणारे राळेगाव येथील न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथील १४ व १७ वर्ष वयोगटातील मुले असे दोन संघ झालेल्या



अंतिम स्पर्धेत एकाच वेळी विजेते ठरून हे दोन संघ राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत पात्र झाले आहे.

विजयी १४ वर्ष संघात हे विद्यार्थी खेडाळू म्हणून आवेश नाकेवार, निहालसिंग ठाकूर, स्मित उईके, पुष्कर जुमनाके, यज्ञेश बोभाटे, जिग्नेश वनकर उपस्थित होते. तर १७ वर्ष वयोगटातील मुलांच्या संघात खेळाडूं म्हणून वेदांत बोदडे, मंथन ठाकरे, अर्पित राऊत, सोहम साळवे, नयन पेंदोर, यश ढगले हे खेडाळू उपस्थित होते. हे दोन ही विजयी संघ आता राज्यस्तरीय स्पर्धा जयहिंद पब्लिक स्कूल, उदगीर जि लातूर येथे दिनांक 17 ते 18 जानेवारी साठी पात्र ठरले आहे. या यशस्वी संघा बद्दल न्यू एज्युकेशन सोसायटी, राळेगावचे अध्यक्ष बी. के. धर्मे, सचिव डॉ. अर्चना धर्मे तसेच शाळेचे मुख्याध्यापक विजय कचरे, उपमुख्याध्यापक सुरेश कोवे, पर्यवेक्षक सूचित बेहरे क्रीडा शिक्षक किशोर उईके, आनंद घुगे, प्रवीण कारेकर, वैशाली चौधरी यांच्या सह शाळेतील शिक्षक यांनी अभिनंदन केले आहे...

## एम.आय.एम.या पक्षाच्या यशाने माहुरात जल्लोष; राज्यात मिळालेल्या यशाने सर्वधर्मीयांचा एम.आय.एम.पक्षाकडे कल वाढला

**दैनिक युवक आधार**
**श्रीक्षेत्र माहूर प्रतिनिधी सय्यद ईसा** : महाराष्ट्र राज्यात झालेल्या निवडणुकात एमआयएम पक्षाने भरघोस यश मिळविल्याने एमआयएमचे जिल्हाध्यक्ष सय्यद मोइन साहाब यांच्या मार्गदर्शनाखाली माहूर शहरात ढोल ताशे बँड लावून फटाके फोडत हजारोच्या संख्येने युवकांनी जमा होऊन हजरत टिपू सुलतान र .अ.चौकात जल्लोष साजरा केला .



महाराष्ट्र राज्यात झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत एमआयएम पक्षाने 126 जागावर विजय मिळविला तसेच नांदेड शहरातही 15 जागावर विजय मिळविल्याने पक्षाची राज्यात ताकद वाढत असल्याने सर्व धर्मीय नागरिकांचा एमआयएम पक्षाकडे कल वाढला असून माहूर तालुका एमआयएमचे तालुका अध्यक्ष सज्जाद भाई शेख अजीज तसेच युवा नेते इरशाद भाई मकरानी यांच्या नेतृत्वात युवकांनी हजरत टिपू सुलतान र .अ. चौकात जमा होऊन ढोल ताशे फटाक्याच्या गजरात प्रचंड जल्लोष साजरा केला, यावेळी एमआयएमचे तालुका अध्यक्ष सज्जाद भाई युवा नेते तथा भावी नगराध्यक्ष इरशाद भाई मकरानी बबलू टेलर,फैजुल्ला खान,शहजाद नवाब,अज्जू भाई,अय्युब बाबा,अजिस शेख, शाहिद लाला,अरशद खान,सोहेल एस आर के अर्सलान शेख, शोएब शेरा,बुरहान मिर्झा, दानिश डीजे शब्बीर शेख,लाइक सौदागर,अम्मू सौदागर, मूस्तकीम भाई,जम्मू,भाई,तौफिक बागवान, शाहिद सौदागर,रहीम शेख,फैजान लाला , साबीर भाई, यांचे सह सर्व धर्मीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## देश वाचवायचा असेल तर मानवता हाच धर्म माना; साहित्यरत्न रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर** : देशात जातीभेद धर्मभेद फोफावत आहे .शासन दुःशासन एकाच दिशेने सारख्याच ताकदीने चालत आहेत,तेथेही दुःशासन वरचढ झाला आहे.. देश वाचवायला म.गांधीजजींची डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची मानवताहीच देश वाचविणार आहेत, अन्यथा देशाचे वाटोळे करायला इंग्रजांचे पायचाटू देशद्रोही सज्ज आहेत.असे विचार आपल्या अ़ध्यक्षीय भाषणात साहित्यरत्न प्रा. एल.बी.पाटील यांनी मांडले.ते पनवेल बांठिया सभागृहात नागनाथ डोलारेयांच्या मानवतेचै सिंहासन आणि लावण्यलेणी या पुस्तकाच्या



प्रकाशनाच्या कार्यक्रमात बोलत होते.यावेळी सुभाष कुकडे यांनी प्रास्ताविक केले.ज्येष्ठ साहित्यिका सुनीता जोशी आणि डॉ.सुनीलकांबळे यांच्या शुभहस्ते प्रकाशन झाले. मा.न्या.डा.यशवंत चावरे,शिव महाजन, रोहिदास पोटे यांनी पुस्तकांबद्दल गौरवोद्गार काढले. प्रा.भिमसेन माळी,अजयशिवकर,गज आनन म्हात्रे,रुतला भामरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## शेतकऱ्याच्या मेहनतीवर फिरले पाणी; आग लागल्याने १.२२ लाखांचे नुकसान, मदतीसाठी शासनाकडे डोळे

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस प्रतिनिधी उमेश साखरकर** : निसर्गाच्या लहरीपणामुळे आधीच संकटात सापडलेल्या बळीराजावर आता आगीने घाला घातला आहे. दिग्रस तालुक्यातील तुपटाकळी येथील अल्पभूधारक शेतकरी किसन खेमा चव्हाण यांच्या शेतातील गोठ्याला भीषण आग लागल्याने त्यांचे लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

शेतकरी किसन चव्हाण यांचे शेत गट क्र. १८२ मध्ये आहे. शेतातील कामासाठी त्यांनी तिथे एक गोठा (कोटा) तयार केला होता. शनिवार, दि. १७ जानेवारी रोजी दुपारी सर्वत्र कडक ऊन असताना, अचानक या गोठ्यातून धूर निघू लागला. पाहता पाहता आगीने रौद्र रूप धारण केले आणि संपूर्ण गोठ्याला कवेत घेतले.

शेतकरी चव्हाण यांनी वर्षभराची मेहनत करून पिकवलेला सुमारे ७ ते ८ क्विंटल कापूस विक्रीसाठी या गोठ्यात साठवून



ठेवला होता. आगीची तीव्रता इतकी भीषण होती की, कापसासोबतच शेतीसाठी लागणारे अत्यावश्यक साहित्यही जळून खाक झाले. यात १६ नग स्प्रिंकलर ,पाईप,पेट्रोल स्प्रे पंप,इलेक्ट्रिक स्टार्टर,गोठ्याचे टीनपत्रे आणि इतर घरगुती साहित्य प्राथमिक अंदाजानुसार, या आगीत शेतकऱ्याचे १ लाख २२ हजार ५०० रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. सुदैवाने, आग लागली तेव्हा गोठ्यात कोणीही नसल्याने जीवितहानी टळली, परंतु हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने चव्हाण कुटुंब हादरले आहे.

## मोठे वाघोदे (ता. रावेर) येथे अखंड हरिनाम सप्ताह, श्रीकृष्ण कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : मोठे वाघोदे (बु.) ता. रावेर येथे अखंड हरिनाम सप्ताह, संगीतमय श्रीमद् भागवत कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मोठ्या भक्तिभावात व उत्साहात पार पडला. या धार्मिक सोहळ्याचे आयोजन श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ समिती, समस्त गावकरी मंडळी व तरुण मित्र मंडळ, वाघोदे बु. यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

या सप्ताहासाठी भागवताचार्य ह. भ. प. महंत समाधानजी महाराज भोजेकर हे कथा वक्ते म्हणून लाभले. दिनांक ८ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत संपूर्ण गावकऱ्यांच्या सहकार्याने अखंड हरिनाम संकीर्तन व संगीतमय श्रीमद् भागवत कथा आयोजित करण्यात आली होती. विविध



मान्यवर महाराजांच्या उपस्थितीत हा सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्ष पूर्तीनिमित्त, मानव अधिकार आंतरराष्ट्रीय फेडरेशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष तथा भाजपा अनुसूचित जाती मोर्चा राज्य सचिव प्रा. संजय मोरे व सौ. मायाताई संजय मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

"नमस्ते सदा वत्सले मातृभूमे" या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात होऊन "भारत माता की जय" या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक प्रल्हाद कापसे, श्रावण महाजन, माजी मुख्याध्यापक गंभीर महाजन, सुपडू बाबा भगत, बाजीराव महाजन, राजाराम पवार, हरी कराड, हरी महाजन, वामन पाटील, सखाराम पवार यांचा रुमाल, टोपी, श्रीफळ व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. तसेच गावातील ज्येष्ठ माता गयाबाई पवार व कमलबाई कराड यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी ११ बाल टाळकरी महाराजांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

संध्याकाळी ह. भ. प. गुरुदत्त उपासक श्रीहरी महाराज (दत्त संस्थान, बीड) यांच्या दर्शनाचा भव्य सोहळा पार पडला. या प्रसंगी परिसरातील हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. दुपारी बारा ते तीन या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

संध्याकाळी पाच वाजता भागवताचार्य ह. भ. प. महंत समाधानजी महाराज यांच्या उपस्थितीत मुख्य मार्गावरून भव्य ग्रंथदिंडी सोहळा मोठ्या उत्साहात काढण्यात आला. या कार्यक्रमाला वाघोदे बु. गावासह परिसरातील हजारो भाविकांनी उपस्थिती नोंदवली.या संपूर्ण धार्मिक सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी रमेश पाटील, विजयकुमार बाजीराव पाटील तसेच समस्त गावकरी मंडळीचे मोलाचे सहकार्य लाभले.